# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026


❑ वर्ष - २ रे ❑ अंक -३१३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. ११ जानेवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## श्रीराम मंदिर वर्षपूर्ती: वर्षभरात कोट्यवधी भाविकांनी घेतले रामललाचे दर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अयोध्या**

२२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येत भव्य राम मंदिर सर्वांसाठी खुले झाले आणि केवळ देशात नाही, तर जगात जल्लौष झाला. राजस, सुकुमार अशा रामललाचे दर्शन घेण्यासाठी लाखो भाविकांनी एकच गर्दी केली. राम मंदिरात रामललाचे दर्शन घेण्यासाठी उसळलेल्या जनसागराला एक वर्ष झाले तरी ओहोटी लागलेली नाही. अगदी पहिल्या दिवसांपासून सुमारे सरासरी एक लाख भाविक रामाचे दर्शन घेत असल्याचे सांगितले जात आहे.

सन २०२५ मध्ये शनिवार, ११ जानेवारी रोजी तिथीनुसार राम मंदिरात रामललाची प्रतिष्ठापना झाल्या गोष्टीला एक वर्ष पूर्ण होत आहे. यानिमित्ताने अनेक धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जात आहे. राम मंदिराचे संपूर्ण काम अद्याप झालेले नाही. या वर्षांत राम मंदिर आणि परिसरातील संपूर्ण काम पूर्ण होऊ शकेल, असा दावा श्रीराम जन्मभूमि तीर्थक्षेत्र ट्रस्टच्या वतीने करण्यात आला आहे.राम मंदिराच्या पहिल्या मजल्यावर प्रभू श्रीराम आणि माता-पित्यांच्या मूर्ती बसवल्या जाणार आहेत. श्रीरामांसह माता सीता आणि लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न यांच्या प्रतिमाही



स्थापित केल्या जाणार आहेत. प्रसिद्ध चित्रकार वासुदेव कामत हे या सर्वांची रचना करणार असल्याचे सांगितले जात आहे.

राम मंदिराच्या पहिल्या मजल्यावर राम दरबार बांधला जाणार आहे. राम दरबाराची कलाकृती बनवण्याचे काम सुरू आहे. याच मंदिरात रामचरितमानसकार गोस्वामी तुलसीदास यांची मूर्तीही स्थापन केली जाणार आहे. तसेच राम दरबारात प्रभूंच्या लीलांचे दर्शन भाविकांना घडवण्यात येईल. तसेच राम मंदिर परिसरात अन्य अनेक मंदिरे बांधली जाणार आहेत.

राम नामाचा महिमा अगाध आहे. राम दर्शनाची ओढ भाविकांना लागलेली आहे. केवळ भारत नाही, तर जगभरातून भाविक रामाच्या दर्शनासाठी अयोध्येत येत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, पहिल्या ८ महिन्यात तब्बल अडीच कोटी भाविकांनी रामललाचे दर्शन घेतले. तर २०२५च्या पहिल्या दिवशी अयोध्येत सुमारे १० लाख भाविक दाखल झाले होते. पैकी सव्वा दोन लाख भाविकांनी रामाचे दर्शन घेतले. राम मंदिर दानाच्या बाबतीतही वेगाने पुढे जात असल्याचे पाहायला मिळत आहे. काही रिपोर्ट्सनुसार, राम मंदिरात महिन्याला किमान एक कोटी रुपयांचे दान भाविकांकडून केले जात आहे. सोने-चांदी यांचेही दान मोठ्या प्रमाणावर केले जात आहे. अगदी अल्पावधीतच अयोध्येतील राम मंदिर देशातील सर्वांत श्रीमंत टॉप-१० मंदिरांच्या यादीत समाविष्ट झाल्याचे म्हटले जात आहे.

## हिंगणघाट तालुक्यातील चिचघाट-राठी ठरणार विदर्भातील पहिले 'सौरग्राम'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११हिंगणघाट**

विदर्भातील पहिला शंभर टक्के 'सौरग्राम' होण्याचा मान आता लवकरच वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट तालुक्यातील चिचघाट-राठी या गावाला मिळणार आहे. सौर ऊर्जेच्या प्रकाशात झळकणाऱ्या या गावाने शासकीय निधीची कुठलीही मदत न घेता ही किमया साध्य करणाऱ्या या गावाने संपूर्ण राज्यापुढे एक आदर्श निर्माण केला आहे. महावितरणकडून राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यातील किमान दोन गावे १०० टक्के सौर ऊर्जेवर नेण्याची मोहीम सुरू असून, या मोहिमेंतर्गत चिचघाट-राठी या गावाची निवड करण्यात आली असून, गावातील सौर ऊर्जेची स्थापित क्षमता सुमारे ८११ किलोवॅट झाली आहे.



वर्धा शहरापासून ४० किमीच्या अंतरावर असलेले आणि महावितरणच्या हिंगणघाट (ग्रामीण) उपविभागांतर्गत असलेल्या चिचघाट-राठी या गावाचे हवामान वर्षभर कोरडे असते. उन्हाळ्यात अतिउष्ण असते. मे हा अतिउष्णतेचा असल्याने सोबतच जवळपास वर्षभर असलेल्या स्वच्छ सूर्यप्रकाशाचा वापर करून वीजनिर्मिती करण्याचा मानस करत येथील गावकऱ्यांनी महावितरणच्या आवाहनाला अनुकूल प्रतिसाद देत केंद्र शासनाच्या 'पंतप्रधान सूर्यघर'-मोफत वीज योजनेत सहभागी होत गावाचे शंभर टक्के सौर ऊर्जीकरण करून एकजुटीने 'सौर' उड्डाणाकडे यशस्वी प्रवास सुरू केला आहे.

गावामध्ये घरगुतीच्या ७०, औद्योगिक ४, वाणिज्यिक १, यासोबतच अंगणवाडी, जिल्हा परिषद शाळा, पथदिवे आणि सार्वजनिक पाणीपुरवठा यासारख्या वीजजोडणी असलेल्या ग्राहकांनी छतावर सौरनिर्मिती प्रकल्प उभारून पर्यावरणपूर्वक वीजनिर्मिती सुरू केली आहे. घरगुती श्रेणीतील ७० ग्राहकांपैकी तब्बल ६५ ग्राहकांनी स्वयंस्फूर्तीने बँकेकडून कर्ज घेत, दोन ग्राहकांनी स्वखर्चाने, तर उर्वरित ग्राहकांना पी. व्ही. टेक्सटाइल्स या उद्योगाने दत्तक घेत सौर ऊर्जानिर्मिती प्रकल्प उभारले आहे.

## बीड हत्या प्रकरणातील आरोपींना दणका हत्येसह आता मकोका अंतर्गतही कारवाई होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११बीड**

बीडमधील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील सातपैकी सहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. या आरोपींवर हत्येचा गुन्हा दाखल असून आता मकोका कायद्यांतर्गतही गुन्हा नोंदवून कारवाई करण्यासाठी पोलीस प्रशासनाने हालचाली सुरू केल्याची माहिती आहे. हत्या प्रकरणातील बहुतांश आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी असून हे आरोपी संघटितपणे गुन्हे करत असल्याने त्यांच्यावर मकोका कायद्यांतर्गतही कारवाई केली जाणार आहे.

सरपंच हत्या प्रकरणावरून कारवाईची मागणी झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिवाळी अधिवेशनादरम्यान सभागृहात निवेदन सादर केलं होतं. आम्ही कोणालाही सोडणार नाही आणि वेळ पडली तर आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करू, असं आश्वासन मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलं होतं. त्यानुसार आता पोलीस प्रशासनाकडून हत्येच्या गुन्ह्यातील आरोपींवर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे समजते.



**खंडणीच्या आरोपींवर मकोका कधी?**

पवनचक्की कंपनीला खंडणी मागितल्याप्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मीक कराड याच्यासह विष्णू चाटे आणि सुदर्शन घुले याच्यावर गुन्हा दाखल आहे. यातील विष्णू चाटे आणि सुदर्शन घुले हा खुनाच्या गुन्ह्यातीलही आरोपी आहे. त्यामुळे खंडणी आणि हत्येच्या गुन्ह्याचं कनेक्शन असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. या पार्श्वभूमीवर खंडणीच्या गुन्ह्यात आरोपी असलेल्या वाल्मीक कराड याच्यावरही मकोका अंतर्गत गुन्हा दाखल व्हावा, अशी मागणी केली जात आहे.

**आरोपी कोठडीत**

सीआयडी कोठडीत असलेल्या विष्णू चाटेला शुक्रवारी दुपारी केज न्यायालयात हजर केले. त्याला न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश मुख्य न्या. एस. व्ही. पावसकर यांनी दिले आहेत. तर वाल्मीक कराड १४ जानेवारीपर्यंत पोलिस कोठडीतच असणार आहे. मस्साजोग येथील सरपंच हत्या प्रकरणातील पुरवणी जबाबातून विष्णू चाटे याचेही सहआरोपी म्हणून या गुन्ह्यात नाव आहे. तर, ११ डिसेंबर रोजी आवादा कंपनीचे प्रकल्प अधिकारी सुनील शिंदे यांच्या फिर्यादीवरून वाल्मीक कराड, विष्णू चाटे व सुदर्शन घुले या तिघांविरुद्ध खंडणीचा गुन्हा केज पोलिसात नोंद झाला होता.

दोन्ही प्रकरणांत चाटे आरोपी असला तरी त्याला खंडणीच्या गुन्ह्यात अटक करून न्यायालयीन प्रक्रिया पार पाडली आहे. दोन वेळा मिळून न्यायालयाने एकूण १९ दिवस चाटेला पोलीस कोठडीत ठेवल्यानंतर शुक्रवारी दुपारी तीन वाजता त्याला केज न्यायालयात हजर करण्यात आले. सीआयडी व एसआयटीच्या अधिकाऱ्यांनी त्याला न्यायालयीन कोठडीत ठेवण्याची मागणी केली. मुख्य न्या. एस. व्ही. पावसकर यांनी त्याला न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

## काय होईल ते होईल, आम्ही स्वबळावर लढणार महापालिका निवडणुकींबाबत संजय राऊतांची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११मुंबई**

: विधानसभा निवडणुकीत दारुण पराभवानंतर महाविकास आघाडीमध्ये धुसफूस सुरु झाली आहे. जागा वाटपाच्या घोळामुळे विधानसभा निवडणुकीत आपला पराभव झाल्याचे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं. त्यावर महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये आरोप प्रत्यारोप सुरु झाले आहे. आगामी महापालिका निवडणुकांमध्ये शिवसेना ठाकरे हट महाविकास आघाडीसोबत लढणार नसल्याची माहिती समोर आली आहे. महापालिका निवडणुकांमध्ये आम्ही स्वबळावर लढणार असल्याचे खासदार संजय राऊत यांनी म्हटलं. मुंबई, ठाणे, नागपूर,



पुण्यासह सगळीकडे स्वबाळवर लढणार असल्याचे संजय राऊत म्हणाले. एकदा आम्हाला आजमवून पाहायचं आहे असा आक्रमक पवित्रा संजय राऊत यांनी घेतला आहे.

महानगर पालिका निवडणुकीत आम्ही स्वबळावर लढणार असल्याचा पुनरुच्चार खासदार संजय राऊत यांनी केला आहे. सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकट्याने लढणार असल्याने राऊतांनी स्पष्ट केल्यानंतर महाविकास आघाडीमध्ये वाद होण्याची शक्यता आहे. उद्धव ठाकरे यांनीही पालिका निवडणुकांमध्ये स्वबळावर लढण्याचे संकेत दिले असल्याचे राऊत यांनी म्हटलं आहे.

मुंबईसह नागपूरपर्यंत आम्ही स्वबाळवर लढू. काय होईल ते होईल. एकदा आम्हाला आजमवायचंच आहे. नागपूरलासुद्धा आम्ही स्वबळावर लढणार आहोत. उद्धव ठाकरेंनी तसे संकेत दिले आहेत. शिवसेना शहरप्रमुखांशी आम्ही चर्चा केली. मुंबई, ठाणे, पुणे, नागपूरबाबत आमचं ठरत आहे. कार्यकर्त्यांना संधी कधी मिळणार. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत कार्यकर्त्यांना लढण्याची संधी मिळत नाही. त्याचा फटका पक्षाच्या वाढीला बसतो. महानगर पालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायतीमध्ये स्वबळावरुन लढून आपआपले पक्ष मजबूत करावेत, असं संजय राऊत म्हणाले.

दरम्यान, विधानसभा निवडणुकीच्या निकालावरुन महाविकास आघाडीत आता खटके उडत आहेत. महाविकास आघाडीच्या दारुण पराभावानंतर मविआचे नेते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत आहेत. विधानसभेसाठी जागावाटपात वेळ घालवल्यामुळे पराभवाला सामोरं जावं लागल्याचा आरोप काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार आणि नितीन राऊत यांनी केला आहे. यावरुन आता शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी मरगळ झटका आणि कामाला लागा असा सल्ला दिला. त्यावर प्रत्युत्तर देताना विजय वडेट्टीवार यांनी अमोल कोल्हेंनी आपल्या पक्षाकडे लक्ष द्यावं असा सल्ला दिला होता.

## 'फटके बसले असतील, म्हणून' राऊतांच्या घोषणेनंतर शिंदे गटाच्या नेत्याचं वक्तव्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११मुंबई**

पक्षाचे राज्यसभा खासदार संजय राऊत यांनी महाराष्ट्रातील महापालिका निवडणुकीसंदर्भात मोठी घोषणा केली आहे. राऊत म्हणाले की, आम्ही बीएमसीची निवडणूक स्वबळावर लढू. मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर या सर्व ठिकाणी पालिका निवडणुका आम्ही स्वबळावर निवडणूक लढवू. राजकीय वर्तुळात राऊतांच्या या वक्तव्याचे पडसाद उमटत आहेत. यावर आता शिंदे सेनेची पहिली प्रतिक्रिया समोर आलीय.

उद्धव ठाकरे यांनी पुढील पालिका निवडणुका स्वबळावर लढवण्याचे संकेत दिले आहेत, असं संजय राऊत म्हणालेत. त्यांच्या या वक्तव्यानंतर शिंदे गटाची पहिली प्रक्रिया समोर आलीय. यासंदर्भात बोलताना



शिवसेना शिंदे गटाचे नेते उदय सामंत म्हणाले की, त्यांच्यात काय चाललंय, जसं तुम्हाला कळत नाही. तसंच महाराष्ट्राच्या मतदाराला देखील कळत नाहीये.उद्धव ठाकरे यांच्या पक्षाने हा निर्णय का घेतला असावा? यावर बोलताना उदय सामंत म्हणाले की, २०१९ ला जनमताचा कौल असताना देखील काँग्रेससोबत जावून पंजाचा प्रचार केला. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी सांगितलं होतं की, भविष्यामध्ये शिवसेनेकडून काँग्रेसचा प्रचार कधीही होऊ शकत नाही. तसेच भाषणामध्ये हिंदूहृदयसम्राट शब्द न वापरणे, अशा अनेक कारणांमुळे फटके बसले असतील, यामुळे कदाचित हा निर्णय घेतला असेल असं देखील उदय सामंत म्हणालेत.

## १००% फटका बसेल, त्यांना थांबवणारे आम्ही कोण?; ठाकरे गट स्वबळाचा नारा, शरद पवार गटाचे भाष्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ मुंबई**

विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवानंतर महाविकास आघाडीत धुसफूस सुरु झाली आहे. महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु झाले आहेत. आगामी महापालिका निवडणुकांमध्ये शिवसेना ठाकरे गट महाविकास आघाडीसोबत लढणार नसल्याची माहिती समोर आली आहे. महापालिका निवडणुकांमध्ये आम्ही स्वबळावर लढणार असल्याचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले. मुंबई, ठाणे, नागपूर, पुण्यासह सगळीकडे स्वबाळवर लढणार असल्याचे संजय राऊत म्हणाले. एकदा आम्हाला आजमवून पाहायचे आहे, असा आक्रमक पवित्रा संजय राऊत यांनी घेतला आहे. याला ठाकरे गटातील नेत्यांकडून समर्थन मिळताना दिसत आहे. तर दुसरीकडे महाविकास आघाडीतून संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत.

मुंबईसह नागपूरपर्यंत आम्ही स्वबाळवर लढू. काय होईल ते होईल. एकदा आम्हाला आजमवायचेच आहे. नागपूरलासुद्धा आम्ही स्वबळावर लढणार आहोत. उद्धव ठाकरेंनी तसे संकेत दिले आहेत. शिवसेना शहरप्रमुखांशी आम्ही चर्चा केली. मुंबई, ठाणे, पुणे, नागपूरबाबत आमचे ठरत आहे. कार्यकर्त्यांना संधी कधी मिळणार. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत कार्यकर्त्यांना लढण्याची संधी मिळत नाही. त्याचा फटका पक्षाच्या वाढीला बसतो. महानगर पालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायतीमध्ये स्वबळावरुन लढून आपआपले पक्ष मजबूत करावेत, असे संजय राऊत म्हणालेत. यावर आता शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी नाराजीचा सूर व्यक्त केला आहे.

## 'मी, राऊतांसारखा रिकामटेकडा नाही', फडणवीस यांची बोचरी टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर**

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्याबाबत मी माझे मत व्यक्त केले. त्यावर संजय राऊत काय बोलले, काय म्हणाले? हे मला माहित नाही. त्यांच्या प्रत्येक वक्तव्यावर मी माझं मत व्यक्त करावं? मी काही रिकामटेकडा नाही. ते रिकामटेकडे असल्याने रोजच बोलतात, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बोचरी टीका केली आहे. ते नागपूरमध्ये बोलत होते.

पुढे फडणवीस म्हणाले, राज ठाकरे माझे मित्र आहेत. मात्र उद्धव ठाकरे हे शत्रू नाहीत, असंही एका मुलाखतीत देवेंद्र



फडणवीस यांनी आधीच स्पष्ट केलं होतं. त्यावरून संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली होती. ते म्हणाले होते, भाजप आणि शिवसेनेची २५ वर्षांची मैत्री होती. आम्ही भाजपचे सर्वात विश्वासपात्र मित्र होतो.आता मात्र मित्र राहिलो नाही. भाजपने फोडाफोडीचे आणि सुडाचे राजकारण केले. केंद्रीय तपास यंत्रणेचा वापर केला, अनेकांना जेलमध्ये टाकले. यावेळी राऊत यांनी अप्रत्यपणे देवेंद्र फडणवीस यांनीच मैत्री तोडल्याचा आरोप केला. यावर फडणवीस यांनी राऊतांना रिकामटेकडे असे संबोधून हा विषय बंद केला.उद्धव ठाकरे सेनेने महापालिका तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत आता संपुष्टात येणार असल्याचे जवळपास स्पष्ट झाले आहे. यावर फडणवीस म्हणाले, त्यांची आघाडी तुटेल की कायम राहील याकडे आमचे लक्ष नाही. आम्हाला काही फरकही पडत नाही. महाराष्ट्राला प्रगतीकडे नेण्याचा आमचा प्रयत्न आहे.

## संपादकीय ......

# बिबट्याची दहशत..!

*रोजच बिबट्यांच्या संदर्भात काही ना काहीतरी बातम्या येत असतातच. कधी कुठे बिबटे माणसांवर, लहान मुलांवर हल्ला करतात. कधी ते वासरांचा किंवा क्वचित मोठ्या जनावरांचा फडशा पाडतात. असे म्हटले जाते की, महाराष्ट्राच्या नागरी भागात अंदाजे ६ हजार बिबटे संचार करत आहेत. मंडळी, हे लक्षात घेतले पाहिजे की ही संख्या जंगलाबाहेर असलेल्या बिबट्यांची आहे. नुकतेच पानशेत परिसरात ८ दिवसांत बिबट्यांनी तेरा जनावरांचा फडशा पडलेला दिसून आला आहे. अशाच बातम्या जुन्नर तालुका येथून नियमित येत असतात. बिबट्यांसोबत राहणे अपरिहार्य असल्यामुळे आपल्याला या प्राण्याला समजून घ्यावे लागेल. बिबट्यांपासून सावध राहणे कसे शक्य आहे.*

*बिबट्या हा चपळ, परंतु लाजाळू प्राणी आहे हे आधी लक्षात घ्या. जंगलात गेलात तर वाघ सहज दिसू शकतो, पण बिबट्या दिसणे अवघड आहे. वाघ झाडावर चढू शकत नाही, पण बिबट्या आरामात झाडावर चढू शकतो. हा पण या दोन्हींमध्ये फरक आहे. अन्य मांसाहारी प्राण्यांप्रमाणे बिबट्या हाही निशाचर प्राणी आहे आणि दिवस मावळल्यानंतर तो सक्रिय होतो. बिबट्यांचे झालेले हल्ले पाहिले तर हे सर्व संध्याकाळी सहानंतर व सकाळी सहापूर्वी झालेले आपणास पहावयास मिळतील. बिबटे असलेल्या परिसरातील लोकांनी संध्याकाळनंतर एकटे दुकटे फिरणे पूर्णतः टाळले पाहिजे. या भागातील बहुतांश लोक ही काळजी घेतात परंतु काम संपवून संध्याकाळी उशिरा येणारा एखादा एकटा शेतकरी किंवा एखादी कामगार महिला असेल तर बिबट्याच्या आक्रमणाला बळी पडण्याची शक्यता असते. वाघापेक्षा तुलनेने वजनाला कमी असलेला हा प्राणी सर्वात हुशार भक्षक समजला जातो.*

*बिबट्या शिकार करताना समोरच्या भक्षाच्या उंचीचा विचार करतो असे दिसून आले आहे. मुले उंचीने लहान असतात त्यामुळे ती बिबट्यांना आपले भक्ष्य वाटतात. साहजिकच बिबट्यांच्या हल्ल्यात मुले बळी पडण्याचे प्रमाण जास्त आहे. पुरुष किंवा स्त्री उभी असेल तर तो त्यांच्यावर हल्ला करत नाही कारण त्यांची उंची लक्षात घेऊन तो ते आपले भक्ष्य नाहीत, असा निर्णय घेतो. जर पुरुष किंवा स्त्री खाली बसून गवत कापणीचे किंवा तत्सम काम करत असतील तर बिबट्याला त्यांची उंची कमी दिसते आणि मग तो त्यांच्यावर हल्ला करू शकतो. अंदाज घेऊन हल्ला करणे आणि भक्ष्याच्या नरडीला पकडून बाजूच्या जंगलात फरार होणे ही बिबट्याची शिकार करण्याची पद्धत आहे. जेमतेम ८० किलोचा बिबट्या ४०० किलोची गाय पण ओढत नेऊ शकतो इतकी अफाट ताकद त्याच्या शरीरामध्ये असते. बिबटेप्रवण क्षेत्रामधील लोकांनी समूहाने राहिले तर बिबट्या त्यांच्यावर हल्ला करत नाही.शिकार निवडताना बिबट्या कळपांमध्ये मागे पडणार्या प्राण्याची शिकार करतो. मागे पडणारे प्राणी हे वयस्कर असू शकतात, लंगडे असू शकतात किंवा काही आजाराने ग्रस्त असू शकतात. अशी शिकार करणे बिबट्याला सोपे जाते. माणसांच्या बाबतीत बोलायचे झाले तर माणसांनी पण किमान चार-पाच जण एकत्र चालले पाहिजे आणि चालताना काही ना काही तरी बोलत राहिले पाहिजे. आपल्या गटातील एखादा सदस्य वयस्कर असेल आणि तो मागे पडत असेल तर बाकी लोकांनी आपला चालण्याचा वेग कमी करून त्या व्यक्ती सोबत राहिले पाहिजे तर बिबट्याचा हल्ला टाळता येईल.*

# विमानतळ परिसरात पाळीव प्राण्यांवर तत्काळ निर्बंध लावा

## विभागीय आयुक्त बिदरी यांचे निर्देश : विमानतळ सुरक्षा परिसर संरक्षणाचा घेतला आढावा



**विदर्भ प्रजासत्ताक**


**दि.११ नागपूर –** डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सुमारे दहा किलोमीटर परिसरात पाळीव प्राणी, पक्षी आदीमुळे विमानांना अडथळा निर्माण होणार नाही याची खबरदारी घ्या. पाळीव प्राण्यांना निर्बंध घाला तसेच परिसरातील स्वच्छता व सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्या, अशा सूचना विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी दिल्या.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात विमानतळ पर्यावरण व्यवस्थापन समितीची बैठक बिदरी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली. त्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी महानगर पालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, सुधार प्रन्यासचे सभापती संजय मीना, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, मिहानचे वरिष्ठ विमानतळ संचालक एम.ए.आबिद फरी, सह महाव्यवस्थापक एल.आर.भट, जीएमआर कंपनीचे मिलिंद पैडरकर, पोलीस उपायुक्त लोहित मतानी, सीआयएसएफचे एन.एस.रावत, विमानतळ व्यवस्थापक वासिम अहमद खान, स्वप्नील साने, अन्न व औषध प्रशासनाच्या वर्षा खरात, पर्यावरण विभागाच्या हेमा देशपांडे आदी यावेळी उपस्थित होते.बिदरी म्हणाल्या, पशु, प्राणी व पक्षी यांचे वास्तव्य या विमानतळ परिसराच्या दहा किलोमिटर राहणार नाही यासाठी वनविभाग, महापालिका, मिहान तसेच स्थानिक स्वराज्य समितीद्वारे पाहाणी करावी. नियमितपणे तपासणी करावी, या परिसरात पाळीव प्राणी, पक्षी यांचे वास्तव्य होऊ नये याची खबरदारी घ्यावी. यासाठी या परिसरातील गावांमध्ये याबाबत जनजागृती मोहिम राबविण्याची सूचना केली.

विमानतळ परिसराच्या सुरक्षेसाठी संरक्षण भिंत तयार करण्यात आली आहे. परत काही भागात श्वानाचा वावर आढळून आला असून, पक्षी अथवा इतर कारणांमुळे विमानसेवा प्रभावित होणार नाही. यासाठी महापालिकेने आवश्यक उपाययोजना कराव्यात असेही त्यांनी सांगितले. विमानतळावर निर्माण होणारा दैनंदिन कचरा गोळा करण्यासाठी आवश्यक प्रणाली तयार करावी तसेच या कचऱ्याची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी व यंत्रणा निर्माण करावी यासाठी महापालिकेचे सहकार्य घ्यावे असे विभागीय आयुक्त बिदरी यांनी सांगितले.

### विमानतळावरील अवैध वाहतुकीविरुद्ध कारवाई करा

विमानतळाच्या तसेच परिसरातील सुरक्षेसोबतच येथील अवैध वाहतुकी संदर्भात पोलीस विभागाने कारवाई करावी, तसेच त्रृटी संदर्भात संबंधित विभागांनी तात्काळ उपाययोजना करुन अहवाल सादर करण्याचे निर्देशही यावेळी दिले.



# महाराष्ट्र सरकारकडून इस्राईलमध्ये नोकरीची संधी

## नियम आणि अटी कोणत्या?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११मुंबई** – महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत मुंबई उपनगर जिल्ह्यातील उमेदवारांना, इस्राईल येथे रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येत असल्याची माहिती विभागाने दिली आहे.इंग्रजी भाषेचे सामान्य ज्ञान असणाऱ्या, वय वर्षे २५ ते ४५ वयोगटाचे उमेदवार या योजनेमध्ये सहभागी होण्यास पात्र आहेत. सोबतच उमेदवारांकडे काळजीवाहू (घरगुती सहायक) सेवांसाठी निपुण/पारंगत, भारतातील नियामक प्राधिकरणाव्दारे मान्यताप्राप्त असलेले व किमान ९९० तासांचा कोर्स पूर्ण केलेले प्रमाणपत्र असणे आवश्यक (including OJT) आहे. भारतीय प्राधिकरणाद्वारे प्रदान केलेल्या मिडवायफरी मधील प्रशिक्षण, संबंधित भारतीय अधिका-यांच्या देखरेखीखाली किंवा नर्सिंग, फिजिओथेरपी, नर्स असिस्टंट मधील प्रशिक्षण पूर्ण असणे आवश्यक, तसेच जीडीए/ एएनएम/ जीएनएम/ बीएससी नर्सिंग / पोस्ट बीएससी नर्सिंग (GDA/ANM/GNM/Bsc Nursing/Post Bsc Nursing) ची शैक्षणिक पात्रता असणे आवश्यक आहे.दरम्यान, या संधीचा लाभ घेण्यासाठी तसेच अधिक माहिती व नोंदणीसाठी www.maharashtra international.com या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई उपनगर चे सहायक आयुक्त शैलेश भगत यांनी केले आहे.



# विहीर योजनेत मोठा बदल, आता 'हे' शेतकरीही पात्र, जाणून घ्या सविस्तर

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत पाच लाख रुपयांच्या अनुदान मर्यादेमध्ये एससी, एसटी, ओबीसी, ओपन अशा सर्व प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी सिंचन विहीर योजना राबवली जाते. याच योजनेच्या संदर्भात अतिशय महत्त्वाचा बदल आज ८ जानेवारी २०२५ रोजी एकाच्या माध्यमातून घेण्यात आलेला आहे.

याबाबत शासनाच्या माध्यमातून नवीन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या निर्णयानुसारइंदिरा आवास योजना आता प्रधानमंत्री आवास योजनेत विलीन करण्यात आली आहे. भोगवटदार वर्ग २ जमिनी करणारे शेतकरी सुद्धा विहिरीच्या योजनेसाठी पात्र करण्यात आलेले आहेत. याच पार्श्वभूमीवर २०२२ च्या सिंचन विहिरीसाठी असणाऱ्या ज्या काही एसओपी आहेत, यात बदल करण्यात आला आहे.



कृषी विशेष

इथे पहा सविस्तर शासन निर्णय

या निर्णयानुसार ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या विहिरी योजनेंतर्गत लाभार्थ्यांची निवड करत असताना इंदिरा आवास योजनेच्या अंतर्गत लाभार्थी आहेत. या लाभार्थ्यांच्या अटी ऐवजी आता नवीन प्राधान्यक्रम समाविष्ट करण्यात आलेला आहे, तो म्हणजे प्रधानमंत्री आवास योजनेखाली लाभार्थी असतील. आता घरकुल योजनेचे लाभार्थी या विहिरीच्या योजनेसाठी लाभार्थी असणार आहेत.

भोगवटादार वर्ग २ च्या जमीन धारण करणारे

याचबरोबर योजनेच्या अंतर्गत लाभधारकाची पात्रता असेलेले लाभार्थी आहेत, अशा सर्व लाभार्थ्यांमध्ये लाभार्थ्यांचे पात्रतेचे निकष पूर्ण करणारे लाभार्थी, ज्यांच्याकडे जमीनी भोगवटादार वर्ग दोनच्या आहे. भोगवटादार वर्ग २ च्या जमीन धारण करणारे भूधारक देखील या विहिरी योजनेच्या लाभासाठी पात्र असणार आहेत. यामुळे एससी, एसटी, ओपन, ओबीसी प्रवर्गातील जे काही अल्पभूधारक शेतकरी आहेत, अशा सर्व शेतकऱ्यांना भोगवटादार वर्ग २ ची जमीन असेल तरीसुद्धा विहिरीच्या अनुदानासाठी लाभासाठी पात्र असणार आहे.

# उपचारातील निष्काळजीपणामुळे बालकाचा मृत्यू

## सीएसच्या अहवालावरुन डॉक्टरविरुध्द गुन्हा दाखल

### बडनेरा हद्दीतील दीड वर्षापुर्वीचे प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**


**दि.११अमरावती:**दीड वर्षापूर्वी झालेल्या बालकाच्या मृत्युप्रकरणी जिल्हा शल्य चिकीत्सकांनी दिलेल्या अहवालावरुन बडनेरा पोलिसांनी संबंधीत खासगी डॉक्टरविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. निष्काळजीपण ामुळे उपचार केल्यामुळे बालकाचा मृत्यू झाल्याचे चौकशीत निष्पन्न झाल्याचे याप्रकरणी उघडकीस आले आहे.तेजस नंदू मेश्राम (वय १६) या बालकाला ताप आल्यामुळे त्याला बडनेरा भागातील एका खासगी हॉस्पीटलला १४ जुलै २०२३ रोजी दाखल करण्यात आले होते. तेथून पीडीएमसी आणि पीडीएमसी मधून नागपूरला मेडीकल कॉलेजमध्ये नेले. तेथे उपचारादरम्यान २४ जुलै २०२३ ला तेजचा मृत्यू झाला. अजनी पोलिसांनी मर्ग दाखल करुन हे प्रकरण बडनेरा पोलिसांनी वर्ग केले. तपासादरम्यान तेजसचे वडील नंदू मेश्राम यांनी बयान दिले की, खासगी हॉस्पीटलमध्ये चुकीच्या उपचारामुळे आणि निष्काळजीपणामुळे त्यांचा मुलाचा मृत्यू झाला. त्यानंतर हे प्रकरणजिल्हा शल्य चिकीत्सकां कडे चौकशीसाठी गेले. तेजसवर केलेल्या उपचाराची आणि औषध गोळंकीच तपासणी करण्यात आली. त्यानंतर जिल्हा शल्य चिकित्सकांनी दिलेल्या अहवाला वरुन संबंधीत हॉस्पीटलच्या डॉक्टर विरुध्द कलम ३०४ अनुसार गुन्हा दाखल करण्यात आला.




# क... कोलेस्ट्रॉलचा

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक**

कोलेस्ट्रॉल शरीराच्या प्रत्येक पेशीसाठी आवश्यक घटक आहे. कोलेस्ट्रॉलशिवाय शरीर हार्मोन्स तयार करू शकत नाही. शरीरात ५ प्रकारचे कोलेस्ट्रॉल असते. कायलो मायक्रोन, व्हीएलडीए, आयडीएल, एलडीएल आणि एचडीएल.



**कोलेस्ट्रॉलची गरज**

कोलेस्ट्रॉलच्या मदतीने शरीरात महत्त्वाचे हार्मोन्स बनतात. हे शरीराचे संक्रमणापासून संरक्षण करते. कोलेस्ट्रॉलच्या मदतीने शरीरात बायल ॲसिडची निर्मिती होते. आतड्यांतून वसा शोषणासाठी त्याची मदत होते. कोलेस्ट्रॉल हाडांच्या विकासासाठी मदत करणार्या व्हिटॅमिन 'डी'ची निर्मिती करण्यास मदत करते.

कोलेस्ट्रॉलचे एक निश्चित प्रमाण शरीरासाठी अत्यंत आवश्यक असते, पण रक्तातील याचे प्रमाण २५० मिलीग्रॅम प्रती डेसीमीटर किंवा यापेक्षा जास्त होणे धोकादायक होऊ शकते. धमण्यांमध्ये जास्त कोलेस्ट्रॉल जमल्याने रक्ताच्या प्रवाहात अडथळे निर्माण होतात व हृदयासंबंधित आजार उद्भवू लागतात. कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढल्याने पित्ताच्या पिशवीत खडे होण्याचे प्रमाण वाढते.

प्रमाणापेक्षा लठ्ठ लोकांसाठी, रक्तदाबाचा व मधुमेहाचा आजार असणार्या लोकांचे कोलेस्ट्रॉल वाढते.

एकाच जागी बसून राहणारे व पायी न चालणार्यांचे कोलेस्ट्रॉल वाढते.

सिगारेट ओढणारे व जास्त प्रमाणात दारू पिणार्या लोकांचे कोलेस्ट्रॉल वाढते.

आहारात प्रोटिन, कार्बोहायड्रेड व वसाचा योग्य प्रमाणात समावेश करा.

भाज्या शिवण्यासाठी शेंगदाणा तेल, सरसाचे तेल, सोयाबीन, तिळाचे तेल यांचा वापर करा. आहारात मांसाहारी पदार्थ व पनीर कमी करा. सिगारेट व दारू वर्ज्य करा.

ताजी फळे व हिरव्या पालेभाज्यांचे प्रमाण आहारात वाढवा. तणावापासून दूर राहा. नियमित व्यायाम करा

# ग्रामीण पोलीस दल रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत मोफत चिकित्सक शिबिर

***विदर्भ प्रजासत्ताक***

***दि.११तिवसा –***

तिवसा पोलीस स्टेशन येथे अमरावती ग्रामीण पोलीस दल रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत दि.१जानेवारी२०२५ते ३१जानेवारी२०२५ या कालावधी नुसार दि.९जानेवारी २०२५रोजी तिवसा पोलीस स्टेशन येथे मोफत तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.

यामध्ये नेत्र तपासणी व शारीरिक तपासणी शिबिर, रक्तदान शिबीर, रक्त तपासणी असे विविध मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.या मोफत आरोग्य तपासणी शिबिरामध्ये तिवसा तालुक्यातील अनेक ठिकाणांहून शेकडोंच्या संख्येने नागरिक तिवसा पोलीस स्टेशन येथे येऊन मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.तसेच पोलीस स्टेशन तिवसा येथे कार्यरत असलेले सर्व पोलीस कर्मचारी यांनी सुद्धा या शिबिरामध्ये आरोग्य तपासणी केली व रक्तदान सुद्धा केले.



या शिबिरा मध्ये सेवन स्टार फाउंडेशनची टिम उपस्थित होती. डॉ.खुशबु मडावी, डॉ.माधुरी नाकाडे,साहील धुतराज , डॉ.लोहीकर धुतराज ,शिल्पा ठाकरे,व श्री.हॉस्पिटलचे संचालक श्री.सचिन घारपुरे यांच्या समावेश होतो.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. ११ जानेवारी २०२५ शहर/ग्रामिण


# विधानसभा निवडणुकीनंतर बबलू देशमुख गटाला आणखी धक्का

## अखेर जिल्हा बँकचे संचालक प्रकाश काळबांडे अपात्र

## विभागीय सहनिबंधकांचे आदेश, सहकार विभागात खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती** – विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला जबर धक्का बसला. तर अचलपूर विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार आणि माजी जिल्हा बँक अध्यक्ष बबलू देशमुख यांना सुद्धा पराभवाचा सामना करावा लागला. त्यानंतर एक-दीड महिन्याच्या कालावधीत पुन्हा बबलू देशमुख गटाला जोरदार धक्का बसला असून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक प्रकाश काळबांडे यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. विभागीय सहनिबंधकांनी हे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे जिल्ह्याच्या सहकार विभागात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणी संचालक आनंद काळेयांनी



काळबांडेंविरुद्ध तक्रार दाखल केली होती.जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकचे संचालक प्रकाश काळबांडे यांना विभागीय सहनिबंधकाकडून अपात्रेची नोटीस बजाविण्यात आली होती. या नोटिसचे उत्तर सादर करीत काळबांडे यांच्या प्रकरणात विभागीय सहनिबंधक कार्यालयाकडून सुनावणी घेण्यात आली. तब्बल तीन महीन्यांपासून या प्रकरणी सुनावणी - सुरू होती. दरम्यान, गुरुवारला झालेल्या सुनावणी दरम्यान प्रकाश काळबांडे यांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक पदाकरीता अपात्र



घोषित करण्यात आले आहे.

प्रकाश काळबांडे हे सहकार महर्षी बापुसाहेब काळबांडे शालेयकर्मचारी सहकारी पतसंस्थेचे सदस्य असल्याने ते जिल्हा मध्यवर्ती बँकेचे सभासद म्हणून पात्र झाले होते. त्यामुळे आतापर्यंत त्यांनी संचालक पदाची निवडणूक लढविली आणि ते सतत विजयी देखील झाले आहेत. परंतु, ते ३० सप्टेंबर २०१८ ला नोकरीतून सेवानिवृत्त झाल्याने या पतसंस्थेच्या उपविधीनुसार सेवानिवृत्त कर्मचारी सदस्य राहू शकत नाही, असा नियम आहे. त्यामुळे या मुद्यांवरबँकेचे अध्यक्ष माजी मंत्री बच्चू कडू गटातील संचालक आनंद काळे यांनी पतसंस्थेतील सभासद असलेले प्रकाश काळबांडे यांच्या विरोधात तक्रार देऊन त्यांचे सभासदत्त्व रद्द करण्याची मागणी केली होती. याची चौकशी पूर्ण होत त्यांना ४ जुलै २०२४ च्या आदेशान्वये पतसंस्थेने त्यांचे सदस्यत्त्व सेवानिवृत्त झाल्याने रद्द केले आहे. याच निकालाच्या धर्तीवर त्यांना जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालक पदावरून अपात्र ठरविण्याची मागणी करण्यात आली होती. या प्रकरणाची चौकशी देखील विभागीय सहनिबंधकांकडून सुरू करण्यात आली होती. अखेरीस विभागीय सहनिबंधक यांनी काळबांडे यांना बँकचे संचालक म्हणून आपणास अपात्र घोषित का करू नये अशी नोटिस बजावून त्यांना लेखी खुलासाकरिता १३ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजताकार्यालयात हजर राहण्याबाबत कळविले होते. परंतु प्रकाश काळबांडे यांनी त्यांचे उत्तर सादर करण्याकरीता सात दिवसांची म्हणजे २० ऑगस्ट पर्यंतची मुदतवाढ मागितली होती. दरम्यान ५ सप्टेंबर २०२४ ते ९ जानेवारी २०२५ या चार महीन्यांत अनेक सुनावणी पार पडल्या. अखेरीस गुरूवारी एका आदेशान्वे प्रकाश काळबांडे यांना बँकेच्या संचालक पदावरून अपात्र घोषित करण्यात आले आहे. या निर्णयामुळे आता विरोधकांमधील एका संचालकांची संख्या कमी झाली आहे.


# किरीट सोमय्या अशांतता आणि गोंधळ पसरविण्याचे काम करीत आहेत

## खासदार बळवंत वानखडे यांनी केली जोरदार टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ अमरावती** दोघांचे पासपोर्ट अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव सुर्जी तहसील कार्यालयाने बनावट कागदपत्रांच्या आधारे ११०० बांगलादेशी आणि रोहिंग्यांना जन्म दाखले दिल्याचा आरोप किरीट सोमय्या यांनी केला. याला जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखडे यांनी सडेतोड उत्तर दिले आहे. खासदार बळवंत





वानखडे म्हणाले की, अंजनगावसुर्जी हे अतिशय छोटे शहर आहे. जर बाहेरून आलेले ११०० नवीन लोक एकत्र स्थायिक झाले तर सोमय्या यांच्या आधी ही माहिती स्थानिक रहिवाशांपर्यंत पोहोचली असती. मात्र असे काहीही झाले नाही. याचा सरळ अर्थ असा आहे की किरीट सोमय्या अशांतता, अविश्वास आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण करण्यासाठी खोट्याचा आधार घेत आहेत.

या संदर्भात खासदार बळवंत वानखडे म्हणाले की, किरीट सोमय्या यांनी केलेल्या ट्विटमध्ये मोठी त्रुटी आहे. किरीट सोमय्या यांनी त्यांच्या ट्विटमध्ये दावा केला आहे कीअंजनगाव फोनवरून ही माहिती दिली आहे. हा दावा त्यांना अत्यंत हास्यास्पद असून, तहसील कार्यालयातून अशी चूक झाली असती, तरी ती कोणत्याही तहसीलदाराने अशा प्रकारे कोणत्याही नेत्याला सांगितली नसती. अंजनगाव सुर्जीच्या तहसीलदार पुष्पा सोळंके याबाबत स्पष्टीकरण देताना म्हणाल्या होत्या की, त्यांच्या कार्यालयात आलेल्या अर्जांना सर्व कागदपत्रे तपासूनच जन्म दाखले देण्यात आले होते आणि ज्या प्रकरणांमध्ये थोडी शंका होती. त्या बाबतचा अहवाल सीईओ आणि बीडीओ कार्यालयाकडून मागवण्यात आला होता. तहसीलदार सोळंके यांच्या या खुलाशाच्या आधारे खासदार बळवंत वानखडेम्हणाले की, अंजनगावसुर्जी शहर व तहसीलमध्ये राहणाऱ्या लोकांची स्वतःची राहणी व बोलण्याची पद्धत आहे. त्याचबरोबर बांगलादेशी आणि रोहिंग्यांची राहणी आणि बोलण्याची पद्धत नक्कीच खूप वेगळी असेल, अशा परिस्थितीत हजाराहून अधिक विविध प्रकारचे लोक एकत्र येऊन आपल्या आजूबाजूला राहू लागले तर त्यावर चर्चा होईल.शेजारच्या लोकांना ते दिसून आले असते. यासोबतच खासदार बळवंत वानखडे यांनी असा सव सवालही उपस्थित केला की, गेल्या महिन्यांत जर ६ बांगलादेशी, रोहिंग्यांसारखे परदेशी नागरिक अंजनगाव सुर्जी येथे आले असतील आणि त्यांनी तेथे आपले स्थान निर्माण केले असेल आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे जन्म दाखलेही घेतले असतील, तर मग यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे गृह मंत्रालय आणि महाराष्ट्र पोलीस काय करत होते ? तसेच अमरावती जिल्ह्यात बांगलादेशी आणि रोहिंग्या इतक्या मोठ्या प्रमाणावर येऊन स्थायिक होत आहेत, हे त्यांना आजपर्यंत कसे कळले नाही. त्यामुळे महाराष्ट्र पोलीस व गृहमंत्रालयाच्या कामावरही प्रश्नचिन्ह निर्माण होत असल्याचे खासदार बळवंत वानखडे प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना म्हणाले.

# गाडी घरी उभी, व्यवस्थापनाचे तीन तेरा

## ३१ चे १३ करून निंभी नाक्यावर टोल कपात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११शिरखेड** : मोर्शी दरम्यान ६० किलोमीटरचे आत वाहनधारकांच्या माथी दोन टोल नाके लावणाऱ्या यंत्रणेने निंभी टोल नाक्यावर गाडी चक्क घरी उभी



असतांना फास्ट टॅग वरुन टोल कापण्याचा प्रताप करून दाखवला.प्राप्त माहितीनुसार वरूड येथिल वाहनधारक संजय लांडे यांना ६ जानेवारी रोजी सकाळी ११.३३ मिनिटांनी निभि टोल नाक्यावर ४० रूपये कटल्याचा मोबाईलवर मॅसेज आला. यावेळी त्यांची गाडी क्रमांक एम एच २७डी एल १९३१ घरासमोर उभी होती. हा प्रकार पाहून त्यांना सुरुवातीला धक्का बसला. याबाबत त्यांनी निंभी टोल नाक्यावर जावून शहानिशा केली. यानुसार ६ जानेवारी रोजी सकाळी ११.३३ वाजता सीसीटिव्ही फुटेज नुसार एम एच २७ डी एल १९१३ क्रमांकाचेवाहन पास झाले. पण त्या ठिकाणी कार्यरत कर्मचाऱ्याने संगणकावर १९१३ ऐवजी १९३१ अशी नोंद घेतली आणि संजय लांडे यांच्या फास्ट टॅग मधून ४० रूपये कटले. या प्रकाराने नाहक मनस्ताप सहन करावालागला आहे. ३१ चे१३ करून व्यवस्थापनाचे तीनतेरा वाजवत आहे. गलथान कारभाराचाहा उत्कृष्ट नमुना आहे. असे प्रकार अनेक वाहन धारकांच्या बाबतीत घडतअसल्याची चर्चा आहे. थोड्याच दिवसात रस्त्याला मोठ्या भेगा पडल्या आहेत. यात वाहन चालवताना अपघात घडत आहे. असे असताना ६० किलोमीटरचे आत वाहनधारकांनानीं भी टोलमुळे नांदगाव पेठ येजा ४५ रूपये वनिभिटोल ये जा अतिरिक्त ६० रूपये भुर्दंड सोसावा लागत आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी ६० किलोमीटरचे आतदुसराटोल असणार नाही अशी पोस्ट सध्या समाज माध्यमावर व्हायरल होत आहे. याचा धागा पकडून नागरिक निंभी टोल नाका हटविण्याची मागणी करत आहे.

# १३ ते १६ जानेवारी पोलीस तक्रार निवारण अभियान

## सीपी नविनचंद्र रेड्डी यांच्या मार्गदर्शनात मोहिम , त्वरीत तक्रारीचा होणार निपटारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ अमरावती–** नविनचंद्र रेड्डी, पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे मार्गदर्शनात १३ ते १६ जानेवारी २०२५ या कालावधीत वसंत हॉल, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे 'पोलीस तक्रार निवारण अभियान' राबविण्यात येणार आहे.

या अभियानाता सलग ४ दिवसतिन्ही विभागातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तसेच पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा यांच्याकडे प्रलंबित तकार अर्ज आहेत, असे सर्व अधिकारी व अंमलदार हेस्वतः नाठिकाणी हजर राहून तक्रारीचानिपटारा करणार आहेत.पोलीस स्टेशन येथे अनेक नागरिक नापल्या समस्यांबाबत तकार अर्ज देत नसतात. त्यातील गुन्हयाचे स्वरूप नसलेल्या तकारीनुसार गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात ते. परंतु काही तकारीमध्ये चौकशी रूनच पुढील कायदेशीर कार्यवाही करणे आवश्यक असल्याने अशा क्रारींवर चौकशी अंती कायदेशीर कार्यवाही करण्यात



येते. अशा प्रकारच्या काही कारणास्तव प्रलंबित तकारीवर योग्यतो कायदेशीर कार्यवाही तातडीने करण्याचे अनुषंगाने नमुद तकार अभियाना मध्ये सलग ४ दिवस तिन्ही विभागातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तसेच पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा यांच्याकडे प्रलंबित तकार अर्ज आहेत, असे सर्व अधिकारी व अंमलदार हे स्वतः याठिकाणी हजर राहून तक्रारीचा निपटारा करणार आहेत.

तसेच शहरातील काही नागरिकांना त्यांच्या समस्यांबाबत तकार सादर करावयाची असल्यास असे तक्रारदार सुध्दा याठिकाणी त्यांच्या तक्रारीचे निवारण करण्याकरीता उपस्थित राहु शकतात. या करिता १३ ते १६ जानेवारी पर्यंत तक्रारदारांना बोलवून तकारीचा निपटारा करण्यात येणार आहे. या अभियाना मध्ये प्राधान्याने वरिष्ठ स्थरावरील तकार अर्ज व स्थानिक प्रलंबित अर्ज यांचे चौकशी करून जास्तीत जास्त अर्जावर कायदेशीर कार्यवाही होईल याकडे सहायक पोलीस आयुक्त हे स्वतः लक्ष देणार आहेत. त्याचप्रमाणे संपूर्ण तक्रार निवारण अभियानामध्ये देखरेख व निर्गतीबाबत परिमंडळ, पोलीस उपायुक्त हे स्वतः मार्गदर्शन करणार आहेत. नविनचंद्र रेड्डी, पोलीस आयुक्त, अमरावती शहर हे स्वतः या 'पोलीस तक्रार निवारण अभियान' प्रसंगी उपस्थित राहून तकारदारांच्या तकारींचे निवारण करणार आहेत. तसेच या प्रसंगी शहरातील काही नागरिकांना त्यांच्या समस्यांबाबतनव्यानेतक्रार सादर करावयाची असल्यास असे तकारदार सुध्दा याठिकाणी त्यांच्या तकारींचे निवारण करण्याकरीता उपस्थित राहु शकतात.

अमरावती शहर पोलीस आयुक्तालयातील सर्व प्रलंबित अर्ज तक्रारदारांनी सदर तक्रार निवारण अभियानामध्ये सहभागी होउन तकारीचे निवारण करून योग्य कायदेशीर कार्यवाही करून घेण्याचे आव्हान नविनचंद्र रेड्डी, पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांनी सर्व तक्रारदार नागरिकांना केले आहे.

# महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतील थकीत मजुरीसाठी मेळघाटातील युवकांचा जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११चिखलदरा**

मेळघाटातील (चिखलदरा व धारणी तालुका) युवकांनी महात्मा गांधी रोजगार हमी योजनेतील थकीत मजुरीच्या रकमेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले आहे. या योजनेत काम करणाऱ्या मजुरांची मजुरी वर्षभरापासून थकीत आहे, ज्यामुळे त्या कुटुंबांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे.

महात्मा गांधी रोजगार हमी योजना ही मेळघाटातील आदिवासी कुटुंबांसाठी जीवनावश्यक आहे, कारण या कुटुंबांच्या उदरनिर्वाहासाठी त्यांना मिळणारी मजुरी अत्यंत महत्त्वाची ठरते. ती रक्कम वेळेवर मिळत नसल्यामुळे त्यांची परिस्थिती आणखी कष्टी होऊ शकते, अशी चिंता या युवकांनी व्यक्त केली आहे.जर या रकमेची त्वरित अदा केली गेली नाही, तर ते इतर गावांमध्ये रोजगाराच्या शोधात भटकतील. यामुळे त्यांचे जीवन आणखी अवघड होईल, असे निवेदनात म्हटले आहे. कुटुंबांचे मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि इतर जीवनावश्यक गरजा यांवर या मजुरीचे प्रत्यक्ष परिणाम होतात, त्यामुळे ही रक्कम लवकर मिळवण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे, असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. निवेदनात आकास जामकर, प्रोहीत अथोटे, प्रशांत आठोले, इंजि. अक्षय अथोटे, आणि हर्षल सोनारे हे प्रमुख लोक उपस्थित होते, ज्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे या समस्येवर त्वरित लक्ष देण्याची मागणी केली आहे. युवकांनी म्हटले आहे की, महात्मा गांधी रोजगार हमी योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे स्थानिक नागरिकांना रोजगार उपलब्ध करून त्यांचे जीवनमान सुधारणे. जर या योजनेतील रक्कम वेळेवर दिली गेली, तर ते त्यांच्या कुटुंबासाठी स्वावलंबी होऊ शकतील.तरीही,



प्रशासनाने त्यांची तातडीने ऐकून आणि आवश्यक ती कार्यवाही करून, आदिवासी नागरिकांना मदत करावी, अशी अपील निवेदनात केली आहे. हे निवेदन प्रशासनाने त्वरित संज्ञानात घेऊन थकीत मजुरीसाठी त्वरित उपाय योजना करावीत, अशी मेळघाटातील नागरिकांची अपेक्षा आहे.-



# राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ९ व्दारे पोलीस वर्धापन दिन थाटात साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१२ अमरावती–** '२ जानेवारी' या पोलीस दलाच्या स्थापना दिनानिमित्त येथील राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक ९ तर्फे दि. २ ते ८ जानेवारी दरम्यान एम. राकेश कलासागबर (भो.पो.से.) यांच्या संकल्पनेतून जनसामान्य नागरिक, शालेय विद्यार्थी, खेळाडू तसेच पोलीस कुटुंबियांकरिता विविध कार्यक्रमांच्या आयोजनाच्या माध्यमातून पोलीस वर्धापन दिन साजरा करण्यात आला.

वर्धापन दिनाच्या



उपक्रमांतर्गत राज्य राखीव पोलीस बलाव्दारे पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार तसेच पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यांकरिता एसआरपीएफ व जिल्हा अॅथेलेटीक यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय क्रॉस कंट्री मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

संपूर्ण पोलीस अधिकारी, अंमलदार व पोलीस शिपाई, पोलीसांचे कुटुंब यांच्याकरिता सामुहीक योगा, रक्तदान शिबिर, शालेय विद्यार्थ्यांसाठी निंबध स्पर्धा, चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात सर्वांनी हिरेरिने आपला सहभाग नोंदविला होता.

या उपक्रमांतर्गत राज्य राखीव पोलीस बलाव्दारे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरीता शस्त्र प्रर्दशनी तसेच आपत्ती व्यवस्थापनाचे प्राथमिक प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्यात आले.

आदिवासी बहुल मेळघाट क्षेत्रातील गरजू नागरिकांकरिता आरोग्य व रोगनिदान शिबिर, विविध खेळांचे आयोजन मेळघाट परिसरात करण्यात आले होते. या शिबिराचा मेळघाटातील आदिवासी बांधवांनी लाभ घेतला. पोलीस कुंटुंबियाकरीता आकाश दर्शन कार्यक्रमाचेही एसआरपीएफ गटाव्दारे करण्यात आले होते.

राज्य राखीव पोलीसबल गट क्र. ९ अमरावती यांच्याव्दारे विविध कार्यक्रमांच्या आयोजनासाठी राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १८ काटोलचे समादेशक सुशांत सिंग (भा.पो.से.), एसआरपीएफ गट क्र. ९ चे सहाय्यक समादेशक सुरेश कराळे, एसआरपीएफ गट क्र. १८चे बलराम रोठे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सहा दिवसांच्या विविध कार्यक्रमांच्या यशस्वी नियोजनासाठी पोलीस कल्याण अधिकारी तथा पोलीस निरीक्षक अजय काळसर्पे, पोलीस निरीक्षक राशिद शेख, पोलीस निरीक्षक श्री. येसनकर आदींनी अथक परिश्रम घेतले.

# वरुड-मोर्शीतील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या

## मुख्यमंत्र्यांकडे आमदार उमेश यावलकर यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११वरुड-** वरुड मोर्शी तालुक्यात माहे जुलै ते ऑगस्ट २०२४ या कालावधीत नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरीत नुकसान भरपाई मिळण्याबाबत आमदार उमेश यावलकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव यांचे अमरावती जिल्ह्या करिता १३८ कोटी मिळावे यासाठी मागणी सादर करण्यात आली. त्यात वरुड-मोर्शी मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या फळगळतीचे (संत्रा, मोसंबी) अतिवृष्टीमुळे झालेली नुकसान भरपाई मिळण्यासाठी अमरावती जिल्ह्यातील फळबाग लागवड धारक शेतकऱ्यांना विशेष बाब म्हणून तातडीने अनुदान मंजूर करुन वितरीत करण्याबाबत सबंधीतांना आदेश देण्याबाबत विनंती करण्यात आली.

मंत्रालय मुंबई येथे मोर्शी विधानसभा मतदार संघाच्या विविध प्रश्न व समस्या सबंधित विभागाचे मंत्री महोदय तसेच विविध विभागाच्या सचिवांकडे बैठक घेण्यात आली. दरम्यान राज्याचे मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंदजी जाधव यांचे कडे अतिवृष्टी बाबत शेतकऱ्यांना मदत मिळणासंदर्भात विनंती करण्यात आली. वरूड तालुक्यातील बेनोडा महसूल मंडळात दिनांक १९ ऑगस्ट २०२४ रोजी रात्री दरम्यान अचानक पने जवळपास ६६ मिमी पाऊस झाला. परिणामी शेतकऱ्यांचे विविध पिकांचे नुकसान झाले होते. शासन नियमानुसार ६५ मिमी पाऊस एकाच दिवशी झाल्यास खरीप व संत्रा, मोसंबी पिकांची नुकसान भरपाई व पिक विमा देण्यात येते. त्यामुळे शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळण्याबाबत मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव यांचे कडे विनंती करण्यात आली.

वरुड मोर्शी मतदार संघात मोठ्या प्रमाणात संत्रा लागवड होत असून संत्रा पिकाचे नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले , त्यामुळे वर्धा जिल्ह्यातील नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या फळबाग लागवड शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात आली. त्याच धरतीवर अमरावती जिल्ह्यात विशेष बाब म्हणून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी, याकरिता मुख्यमंत्री व मदत व पुनर्वसन मंत्री यांच्याकडे मागणीचे निवेदन देण्यात आले.

मौजा लाखारा ता. मोर्शी येथील लघु सिंचन संग्रहक तलाव प्रकल्पास विशेष बाब म्हणून सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली. वरूड मोर्शी तालुक्यातील



परिसरात मोठ्या प्रमाणात संत्रा बागा असून पाण्याची नितांत गरज आहे. त्यामुळे त्वरित निधी उपलब्ध करून देण्यात यावा याबाबत मागणी नोंदविण्यात आली, यावेळी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# गोवंशांची १६ क्विंटल शिंगे जप्त

## ५ हजार गोवंशांच्या कत्तलीची भीती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११तेल्हारा-** गोवंशांची १६ क्विंटल वजनाचे शिंगतेल्हारा पोलिसांनी जप्त केली.सुमारे पाच हजार गोवंशांची कत्तलझाल्याची शक्यता असून, यातूनचसुमारे १० हजार शिंगे जमा झाली.प्राथमिक माहितीनुसार शोभेच्यावस्तू, कपड्यांचे बटन करण्यासाठीशिंगे गोळा करण्यात आल्याचीशक्यता सूत्रांनी व्यक्त केली असून, पोलिसांकडून तपास सुरु आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी गोवंशांची निर्दयीतेने वाहतूक सुरू आहे. कत्तलीसाठी नेण्यात येणाऱ्या जनावरांची अनेकदा सुटकाही करण्यात आली. गोवंशांना वाचवण्यासाठी विविध यंत्रणा वस्वयंसेवी संघटनांकडून प्रयत्न करण्यात येतात. मात्र तरीही गोवंशाची अवैध वाहतूक थांबतनसल्याचे दिसून येत आहे.

### एक्सल तुटल्याने वाहन थांबले

एमएच-२१-४४५१ या क्रमांकाच्या वाहनाच्या चाकाच्याउजव्या बाजूचे एक्सेल तुटले. याच ठिकाणी वाहन थांबलेहोते. वाहनावर नागरिकांची नजर पडली. या मालवाहूवाहनामध्ये पोती असल्याचे दिसून आले. वाहनामध्ये शिंगेदिसून आली. काही शिंगांना रंगही होता. गोवंशाची शिंगे हेगोवंशाची कत्तल करून गोवंशांच्या शिंगांची विल्हेवाटलावण्यासाठी घेऊन जात होती, अशीही चर्चा आहे.

दरम्यानतेल्हारा तालुक्यातील दापुरा फाटायेथे मंगळवारी



### अमरावती, अकोटमधून गोळा केले शिंग

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अमरावती, अकोटपरिसरातून ही शिंगे गोळ्या करण्यात आली. त्यामुळे याचभागात गोवंशांची कत्तल झाली की अन्य ठिकाणी, याचाशोध घेण्यात येणार आहे. वाहन मराठवाड्यातील असून,ही शिंगे येथून पुढे कुठे जात होती, जिल्ह्यातून शिंगांच्यातस्करी होतेय काय, हे आता तपासानंतरच पुढे येणारआहे. या शिंगांमध्ये म्हैस वर्गीय जनावरांचीही शिंगेअसण्याची शक्यता आहे. तपासणी अंती यासह अनेकबाबी उजेडात येणार आहेत.

### मराठवाड्यातील वाहनावर तेल्हारा पोलिसांची कारवाई

नागरिकांनाएमएच-२१-४४५१ या क्रमांकाचाट्रक दिसून आला. नागरिकांनी मालवाहू वाहनाची पाहणी केली.यात गोवंशाची मोठ्या प्रमाणात शिंगेअसल्याची दिसून आले. तेल्हारापोलिसांना माहिती मिळताच ठाणेदार प्रमोद उलेमाले यांनी कर्मचाऱ्यांना तातडीने घटनास्थळीरवाना करत कारवाई केली. अडीचलाखांचा मुद्देमाल पोलिसांनी आरोपी सुनील दादाराव मुळे(१९), रा.अहंकार देऊळगाव, ता.जि. जालना, मोहम्मद शफी कुरेशी आताऊल्ला खान (४५), रा.मोहल्ला नाला नजदीक कुरेशियान मज्जिद संभल, उत्तरप्रदेश यांनाताब्यात घेतले. त्यांच्याकडूनगोवंशाची शिंगे अंदाजे १६ क्विंटल(किंमत अंदाजे १६ हजार रुपये),मालवाहू वाहन (किंमत अंदाजे २ लाख ५० हजार) असा एकूण २ लाख ६६ हजार रुपयांचा मुद्देमालजप्त करण्यात आला. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केलाअसून, पुढील तपास पोलिसउपनिरीक्षक नीलेश ठाकरे करीतआहेत.

# संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात विविध प्राधिकरणावर नुटाचे वर्चस्व

## नुटाच्या शिलेदाराची अविरोध निवड करत विद्यापीठात वर्चस्व प्रस्थापित

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती**

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या नुकत्याच झालेल्या स्टँडिंग समितीच्या बैठकीमध्ये नुटा संघटनेचे शिरेदारांची विविध विषयाच्या अभ्यास मंडळ आणि अकॅडमी कौन्सिल म्हणजेच विद्या परिषदेच्या प्राधिकरणावर अविरोध निवड करण्यात आली.

त्यामध्ये विद्या परिषदेत आंतरविद्या शाखेमधून डॉ.संजय देशमुख यांच्या रिक्त झालेल्या जागेवर डॉ आशिष राऊत,शिवाजी कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,अकोला यांची निवड करण्यात आली. डॉ.जीवन पवार यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर कला आणि मानव्यविद्या शाखेमधून डॉ गणेश मालटे,शिवाजी कला,वाणिज्य आणि विज्ञान



महाविद्यालय, चिखली यांची विद्या परिषदेवर निवड करण्यात आलेली आहे.



भौतिकशास्त्र या विषयाच्या अभ्यास मंडळातून डॉ. अजय लाड यांच्या रिक्त झालेल्या जागेवर डॉ सुयोग मानकर, शिवाजीराव मोघे



कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, केळापूर (पांढरकवडा) यांची निवड करण्यात आली आणि



समाजकार्य अभ्यास मंडळामध्ये रिक्त झालेल्या जागेवर डॉ.अनिल विजयराव देशमुख,महात्मा ज्योतीबा फुले समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ यांची निवड करण्यात आलेली आहे. निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांनी नुटा संघटनेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र प्राध्यापक संघटनेचे सचिव डॉ. प्रवीण रघुवंशी यांचे नेतृत्वाला यशाचे श्रेय दिले.संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठावर नुटा संघटनेचा २०२२ मध्ये झालेल्या सिनेट आणि विद्या शाखेच्या निवडणुकीमध्ये ८० टक्के जागा प्राप्त करून निर्विवाद वर्चस्व अधोरेखित केलेला होता, तो आलेख सातत्याने वाढत आहे.या प्रसंगी नुटा संघटनेचे सिनेट सदस्य डॉ.प्रशांत विघे,डॉ. सुभाष गावंडे, , प्राचार्य डॉ देवेंद गावंडे ,डॉ.नितीन टाले, डॉ. नितीन चांगले, डॉ. रवींद्र मुंद्रे, प्राचार्य डॉ.सुभाष गवई, डॉ.संतोष बनसोड, कैलास चव्हाण अमोल देशमुख डॉ. अविनाश बोर्डे, डॉ. महेंद्र मेटे,डॉ.सावन देशमुख यांनी निवड झालेल्या सर्व नवनिर्वाचित सदस्यांचे कौतुक केले.

# करीना च्या धाडसाचे कौतुक ...





अमरावती येथील कठोरा रोड वरील जगदंबा अपार्टमेंट येथे घडलेल्या अग्निकांडामध्ये वास्तव्याला असलेली कु. करीना थापा हिने आपल्या अदम्य साहसाने इमारतीमधील जवळपास २०० लोकांचा जीव वाचवला.. तिच्या या साहसाबद्दल तिला देशाच्या महामहिम राष्ट्रपती यांच्या हस्ते राष्ट्रीय बाल पुरस्काराने गौरविण्यात आले. आज करीना ने ड. यशोमतीताई ठाकूर यांच्या अमरावती येथील भेट घेतली यावेळी तिचे ड. यशोमतीताई ठाकूर यांनी औक्षण करुन तिच्या शौर्याचे , धाडसाचे कौतुक केले.यावेळी नरेंद्र तायडे, मनिष काळबांडे आणि युवक काँग्रेसचे शैलेष काळबांडे उपस्थित होते..

# ग्रामायण उद्यम प्रदर्शनाचे शनिवारी भूमिपूजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११नागपूर:** ग्रामायण प्रतिष्ठानतर्फे सहावे उद्यम प्रदर्शन १६ ते २० जानेवारी २०२५ या कालावधीत आंध्र असोसिएशन, अमृत भवन, सीताबर्डी, नागपूर येथे आयोजित करण्यात आले आहे. प्रदर्शनाच्या भूमिपूजनाचा सोहळा शनिवार, ११ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता संपन्न होणार आहे. हा सोहळा प्रसिद्ध उद्योगपती भगवानजी नारददेलवार यांच्या हस्ते पार पडणार आहे.

ग्रामायण प्रतिष्ठान २०१२ पासून ग्रामीण भागातील विविध उपक्रम, पर्यावरणपूरक प्रकल्प आणि सामाजिक सेवेमध्ये सक्रिय आहे. या प्रदर्शनामध्ये ग्रामीण तसेच स्थानिक उत्पादने, सेंद्रिय शेतीच्या वस्तू, पारंपरिक व पर्यावरणपूरक वस्तू, बचत गटांचे उपक्रम आणि स्वनिर्मित वस्तू यांचे प्रदर्शन होणार आहे.

ग्रामीण तसेच स्थानिक उत्पादने, सेंद्रिय शेतीच्या वस्तू, पारंपरिक व पर्यावरण पूरक वस्तू, बचत गटांचे उपक्रम, स्वनिर्मित वस्तू यांचे प्रदर्शन होईल. यात कौशल्य विकास कार्यक्रम, नावीन्यपूर्ण स्पर्धा, उडठ आणि दाते यांच्यासोबत जोडणारे उपक्रम राबविण्यात येईल. कला दालनात बांबू आर्ट, गोंडी आर्ट, माती काम, कचऱ्यातून तयार केलेल्या कलाकृती यांचे आकर्षण असेल. याशिवाय ई-वेस्ट कलेक्शनमध्ये जुने कपडे व साड्या गोळा करून त्यापासून पिशव्या तयार केल्या जातात. सरकारी योजनांची माहिती, सरकारी उपक्रमांविषयी जागरूकता निर्माण करणारे स्टॉल्स असणार आहेत.

# महावितरण लकी डिजिटल योजनेत आकर्षक बक्षिसे जिंकण्याची संधी

## महावितरणची लकी डिजिटल ग्राहक योजना , ऑनलाईन वीज बिल भरून बक्षिसे मिळवा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती,**महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरणा करणारे सर्व लघुदाब वीज ग्राहक पात्र ठरणार आहेत. १ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन वा तीन पेक्षा अधिक वीज बिले भरून योजनेच्या लाभाची संधी ग्राहकांना उपलब्ध करण्यात आली आहे. ही योजना महावितरणच्या अशा लघुदाब चालू वीजग्राहकांसाठी लागू असेल, ज्यांनी ०१ एप्रिल २०२४ पूर्वी मागील एक वर्ष म्हणजे ०१.०४.२०२३ ते ३१.०३. २०२४ या कालावधीत एकदाही वीज देयकाचा भरणा केलेला नाही किंवा ऑनलाईन वीज देयक भरणा पर्याय वापरलेला नाही. ग्राहकांना लकी ड्रा व्दारे स्मार्ट फोन, स्मार्ट वॉच अशी आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. ग्राहकांनी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरून लकी डिजिटल ग्राहक योजनेचा लाभ घ्यावा, असे महावितरणचे आवाहन आहे.

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

ग्राहक रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पध्दतीने वीज बिल भरणा करण्यास प्राधान्य देत आहेत.

ग्राहकांना डिजिटल पध्दतीने वीज बिलाचा भरणा करता यावा, यासाठी महावितरणकडून संकेतस्थळ, महावितरण मोबाईल पची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिलेली आहे. ग्राहकांना देय रक्कमेवर ०.२५ टक्के डिजिटल वीज बिल भरणा सूट दिली जाते. परिणामी सध्या राज्यात ७० टक्के हून अधिक वीज ग्राहक ऑनलाईन पध्दतीने वीज बिलाचा भरणा करीत आहेत. हे प्रमाण वाढविण्यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन देण्यासाठी लकी डिजिटल ग्राहक योजना राबविण्यात येत आहे. महावितरणच्या प्रत्येक उपविभाग स्तरावर एप्रिल, मे व जून २०२५ या प्रत्येक महिन्यात एक प्रमाणे तीन लकी ड्रा ऑनलाईन पध्दतीने काढण्यात येणार आहेत. प्रत्येक लकी ड्रामध्ये पाच विजेत्यांना स्मार्ट फोन व स्मार्ट वॉच ही बक्षिसे दिली जाणार आहेत. योजनेच्या कालावधीत ग्राहकाने नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, इ. ऑनलाईन वीज बिल भरणा पर्याय वापरून लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर दरमहा एकप्रमाणे सलग तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिने वीज बिल भरणे आवश्यक राहील. अधिक माहितीसाठी महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळा www. mahadiscom.in भेट द्यावी.

# दोन अवैध महिला सावकारांवर सहकार विभागाने टाकली धाड

## स्टॅम्प पेपरसह अन्य दस्ताऐवज जप्त; मोर्शी येथे कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ मोर्शी**

शहरालगत दोन महिला स्वतंत्ररित्या अवैध सावकारी करत असल्याची तक्रार सहकार विभागाकडे प्राप्त झाली होती. या माहितीच्या आधारे सहकार विभागाच्या दोन पथकांनी शुक्रवारी एकाचवेळी धाड टाकून या दोन्ही महिलांच्या ताब्यातील स्टॅम्प पेपर व अन्य दस्तावेज जप्त केले. या प्रकरणात सहकार विभागाने चौकशी सुरू केली आहे. अवैध महिला सावकारावर जिल्ह्यात अलीकडे झालेली ही पहिलीच कारवाई आहे.



काही दिवसांपूर्वीच मोर्शी सहायक निबंधक कार्यालयात एका तक्रारदाराने मोर्शीत दोन महिला अवैध सावकारी करत असल्याची तक्रार दिली. त्या तक्रारीच्या आधारे सहकार विभागले दोन पथके तयार केली. या दोन्ही महिला मोर्शी येथे अप्पर वर्धा विभागाच्या - वापरात नसलेल्या शासकीय वसाहतीतून अवैध सावकारी करत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पथकाने एकाच वेळी दोन्ही महिलांकडे धाड टाकली. त्यावेळी दोन्ही - ठिकाणांहून पथकाला अवैध सावकारी - संबंधित स्टॅम्पपेपर व इतर महत्त्वाचे दस्तावेज मिळून आले. सहकार विभागाच्या पथकाने तेजप्त केले आहेत. ही कारवाई जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांच्या मार्गदर्शनात पथक प्रमुख स्वाती गुडघे, पथक प्रमुख प्रीती धामणे, सुधीर मानकर, प्रदीप देशमुख, अविनाश महल्ले यांच्यासह सहकार विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी केली.लेखीपेक्षा तोंडी व्यवहार जास्त या दोन्ही महिला मागील काही महिन्यांपासून अवैध सावकारी करत आहेत. त्यांनी लेखी व्यवहारापेक्षा तोंडी व्यवहारच अधिक केल्याची माहिती सहकार विभागाला प्रथमदर्शनी मिळाली असल्याचे सूत्रांनी सांगितले आहे.

महिला अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात कारवाईसाठी नेमले पथक तक्रारदाराने महिला अवैध सावकारी करत असल्याचे सांगितल्यानंतर जिल्हा उपनिबंधकांनी कारवाईसाठी महिला अधिकारी, कर्मचाऱ्यांचे स्वतंत्र पथक तयार केले. महिला अधिकाऱ्यांनीच पुढाकार घेऊन ही कारवाई यशस्वी केली. या वेळी पुरुष अधिकारी, कर्मचारी त्यांच्या मदतीसाठी ह होते मात्र नेतृत्व महिला अधिकाऱ्यांनीच केले.जप्त केले आहेत. ही कारवाई जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांच्या मार्गदर्शनात पथक प्रमुख स्वाती गुडघे, पथक प्रमुख प्रीती धामणे, सुधीर मानकर, प्रदीप देशमुख, अविनाश महल्ले यांच्यासह सहकार विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी केली.

# आरटीईसाठी २२४ शाळा, २४२० जागा

# पालकांना आता प्रवेशाच्या वेळापत्रकाची प्रतीक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

आर्थिक दुर्बल घटकांतील पाल्यांना खासगी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेता यावे याकरिता राबविण्यात येत असलेल्या आरटीई प्रवेश प्रक्रियेला जिल्ह्यात सुरूवात झाली असून यंदा २२४ शाळा प्रवेशासाठी पात्र ठरल्य आहेत. त्या माध्यमातून २४२० जागांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यंदा एक महिना अगोदरच ही प्रक्रिया




सुरू करण्यात आली असून पालकांना आता प्रवेशाच्या वेळापत्रकाची प्रतिक्षा लागली आहे.यंदा डिसेंबर महिन्यापासूनच आरटीई प्रक्रियेला सुरूवात झाली.पहिल्या टप्प्यात १६ डिसेंबर ते ४ जानेवारी दरम्यान शाळा नोंदणीची प्रक्रिया राबविण्यात आली. २२४ शाळांची नोंदणी आटोपली असून यंदा १० शाळा बाद झाल्या आहे. काही संस्थांनी अल्पसंख्याक संस्था विभागाकडे सादर केले असून काही संस्था बंद पडल्या आहेत. यामध्ये अमरावती शहरात सर्वाधिक ५८ तर अमरावती तालुक्यात २२ शाळांची नोंदणी करण्यात आली आहे. चिखलदरा व धारणी या दोन तालुक्यात सर्वात कमी म्हणजे एका शाळेची नोंदणी आहे.मागील वर्षी उशिराने ही प्रक्रिया सुरू झाल्याने पालकांनी त्याकडे पाठ फिरविली. परिणामी अर्जाची संख्याअतिशय कमी झाली होती. केवळ साडेसहा हजार अर्ज प्राप्त झाले होते, मात्र यंदा दहा हजारांवर अर्ज प्राप्त होण्याचे संकेत आहेत. आता प्रत्यक्षात ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची तारीख केव्हा जाहीर होणार याकडे लक्ष लागले आहे.

# अटल क्रिकेट स्पर्धेत स्टारसह रोहन इलेव्हन ठरले विजेते

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

अटल टेनिसबॉल क्रिकेट स्पर्धेत अकोली क्रिकेट क्लब क्रुद्धि अकोली एकता क्लब या दोन संघांमध्ये उद्धाटनीय लढत झाली. त्यानंतर स्टार व रोहन इलेव्हन संघाने उत्कृष्ट सांघिक कामगिरीसह विजय मिळवला. यावेळी दसरा इलेव्हन विरुद्ध स्टार इलेव्हन सामन्यात स्टार इलेव्हनचा संघ २० घावांनी विजयी झाला. या सामन्यात स्टार इलेव्हनचा गोलंदाज नीलेशने विकेटची हॅटट्रिक केली. तर दुसरा सामना एसीसी विरुद्ध रोहन इलेव्हन संघात झाला. या सामन्यात रोहन इलेव्हनने ९ विकेट्सने विजय



मिळवला, उपांत्यपूर्व फेरीत स्टार इलेव्हन विरुद्ध रोहन इलेव्हन असा सामना झाला. या सामन्यात रोहन इलेव्हन हा संघ ७ विकेट्सने विजयी झाला. दोन खेळाडू दसराइलेव्हनतर्फे नीलेश तर स्टार इलेव्हनतर्फे शिवा यांनी हॅटट्रिक घेतली. दिवसभरात एकूण १० षटकार ठोकण्यात आले. तत्पूर्वी, माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था व अकोली क्रिकेट क्लबच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विदर्भ स्तरीय टेनिस बॉल ३५ वर्षांवरील क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन म्हाडाचे सीओ विशाल देशमुख यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष तुषार भारतीय तर माजी महापौर चेतन गावंडे, विलास नायसे, अनिल नंदनवार, सुनील चौकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.उद्घाटनप्रसंगी प्रास्ताविक चेतन गावंडे यांनी केले. सूत्रसंचालन अमोल देशमुख यांनी केले, तर आभार नीलेश मालधुरे यांनी मानले.

# आ. राजेश वानखडें विरोधात महसूल कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन

## आढावा बैठकीदरम्यान वापरलेल्या असंवैधानिक भाषेचा निषेध : पटवारी, कोतवाल, महसूल अधिकारी सोमवारपर्यंत संपावर





नागरिकांच्या विकासकामांसाठी मी तहसील कार्यालयात आढावा बैठक घेतली, मात्र त्यावेळी संबंधित विभागप्रमुख उपस्थित नव्हते किया त्यांना तशा सूचनाच प्रशासनाकडून देण्यात आल्या नाही. नागरिक आपापली कामे सोडून दूरवरून बैठकीसाठी आले होते. त्यामुळे मी अधिकाऱ्यांवर नाराजी व्यक्त करणे साहजिक होते. याशिवाय मी अवास्तव काहीही बोललो नाही.

**राजेश वानखडे, आमदार, तिवसा.**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

आमदार राजेश वानखडे यांनी गुरुवारी अमरावती तहसील कार्यालयात पार पडलेल्या आढावा बैठकीदरम्यान महसूल अधिकारी, कर्मचाऱ्यांसंदर्भात वापरलेल्या असंवैधानिक भाषेचा निषेध व्यक्त करीत अमरावती तालुक्यातील पटवारी, कोतवाल, मंडळ अधिकारी, महसूल अधिकाऱ्यांनी सोमवारपर्यंत कामबंद आंदोलन पुकारले आहे.

गुरुवारी अमरावती तहसील येथे तालुक्यातील विविध कामांच्या आढावा संदर्भात आ. राजेश वानखडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीदरम्यान आ. राजेश वानखडे यांनी अधिकारी, कर्मचारी यांना उद्देशून असंवैधानिक भाषेचा वापर करुन आक्रमकपणे व्यवहार केला.या सभेत ३०० नागरिक उपस्थित होते. त्यांच्या या आक्रमकतेमुळे सभेमध्ये शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांकरिता असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाल्याची भीती व्यक्त करीत आमदारांनी असंवैधानिक भाषेचा वापर केल्याने विविध महसुली कर्मचाऱ्यांनी निषेध नोंदविला. विदर्भ पटवारी संघ, जिल्हा महसूल कर्मचारी संघटना व राज्य कोतवाल संघटनेच्या नेतृत्वात गुरुवारी निवेदन सादर करून १० ते १३ जानेवारीदरम्यात् कामबंद आंदोलनाचा इशारा दिला. त्यामुळ शुक्रवारपासून अमरावती तालुक्यातील पटवारी, कोतवाल, मंडळ अधिकारी, महसूल साहाय्यक असे १७५ कर्मचारी संपात सहभागी झाले आहेत. सोमवारी जिल्हास्तरावरील पदाधिकाऱ्यांशी चर्चेनंतर पुढील आंदोलन ठरवू, असे यावेळी संघटनेचे गोपाल लांजेवार यांनी सांगितले.

# नाउमेद होऊ नका, सक्रियपणे काम करा

# ॲड. यशोमती ठाकूर यांचा कार्यकर्त्यांना सल्ला

## भातकुली तालुका काँग्रेस कमिटीची आढावा बैठक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

सत्ता येते अन जाते, पराभव झाला असला तरी सक्रियपणे सर्वासामान्य जनता अन शेतकरी यांच्या मदतीसाठी तत्पर रहा. मी तुमच्या पाठीशी काल आणि आज मुद्धा खंबीरपणे आहे, अशी ग्वाही माजी मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी दिली,त्या नुकत्याच पार पडलेल्या भातकुली तालुका काँग्रेस कमिटीच्या पदाधिकारी व कार्यकर्ता आढावा बैठकीत बोलत होत्या. हे सरकार कशा पद्धतीने सत्तेत आले हे सर्वांनाच माहिती आहे. हे सरकार पूर्णपणे शेतकरी विरोधी असून केवळ मूठभर उद्योगपतीचे हित जोपासत आहे. या सरकारला धडा शिकविण्यासाठी आपण सर्वांनी लढले पाहिजे, रस्त्यावर उतरत पाहिजे असे आवाहन यशोमती ठाकूर यांनी यावेळी केले. या प्रसंगी खासदार बळवंत वानखडे यांनी सुद्धा सरकारवर बोलतांना सडकून टीका केली.पदाधिकारी कार्यकर्ता आढावा बैठकीला अमरावती जि.प ये. माजी सभापती जयंत देशमुख, जिल्हा सहकारी बँकेचे संचालक हरिभाऊ मोहोड, मुकद्दर खां पठाण, भातकुलीतालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीकांत बोंडे, महिला काँग्रेसच्या अध्यक्ष रेखा सरोदे, नरेंद्र मकेश्वर, आशुतोष देशमुख, धम्मपाल गुडधे उपस्थित होते. यावेळी माजी पंतप्रधान डॉ मनमोहनसिंग, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या मातोश्रीना श्रध्दाजली अर्पण करण्यात आली.


# तळेगाव दशासर येथे १५ जानेवारीपासून शंकरपट

## हजारोंच्या संख्येने यात्रेकरूंची राहणार हजेरी : राज्यभरातून धुरकऱ्यांची नोंदणी सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११तळेगाव दशासर**

शंकरपट कै. नानासाहेब देशमुख यांनी सुरु केलेल्या शकरपटाचे आयोजन कृषक सुधार मंडळाच्या वतीने करण्यात येत आहे. १५ जानेवारी बुधवारपासुन सुरवात होणाऱ्या या महोत्सवाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. लाखोंच्या संख्येने यात्रेकरू येथे हजेरी लावणार आहे. राज्यभरातून धुरकऱ्यांची नोंदणी सुरू केली जात आहे.

तळेगाव येथे १५ जानेवारीला दो दाणी, १६ व १७ ला एकदानी स्पर्धेचे तसेच १८ जानेवारी रोजी महिला आरक्षित बैलजोडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्य कृषी प्रदर्शनी व रविवार १९ जानेवारी रोजी पशु प्रदर्शनीचे आयोजन करण्यात



आले आहे. याकरीता कृक्षक सुधार मंडळाचे सदस्य, कार्यकर्ते स्वयंसेवक गावकरी मंडळी हीसुद्धा जोरात तयारीला लागले आहे. शेतकरी व गावाकऱ्यासाठी पट व यात्रा हा मोठा उत्सव म्हणून यावर्षी सुद्धा अनुभवाला मिळणार असल्याने गावात उत्सहाचे वातावरण निर्माण पहावयास मिळत आहे. या शंकर पटासाठी महाराष्टतील कानाकोपऱ्यातून बैलजोड्या आणून या स्पर्धेत खेळविल्या जातात.यावर्षी सुद्धा विविध राज्यातून नावाजलेल्या बैलजोड्या पटात धावणार आहेत. शंकर पट व यात्रा महोत्सवात दुकानें लावण्या करिता जागा १२ जानेवारी व १३ जानेवारी पासून उपलब्ध करून देणार आहे.

# वाचन माणसाला सुसंस्कृत आणि समृद्ध बनवते - प्रा. डॉ. हेमंत खडके

## वाचनवृद्धीसाठी विद्यापीठात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' उपक्रमाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

महाराष्ट्र शासनाने आवाहन केल्यानुसार दि. १ जानेवारी २०२५ ते दि. १५ जानेवारी २०२५ या कालावधीतसंत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम मा. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या मार्गदर्शनात राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत ज्ञानस्रोत केंद्र आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ७ जानेवारी २०२५ रोजी सामूहिक वाचन आणि 'वाचन आणि व्यक्तिमत्त्व विकास' या विषयावरील विशेष व्याख्यान या कार्यक्रमांचे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे आयोजन करण्यात आले.

'वाचन आणि व्यक्तिमत्त्व विकास'या विषयावरील आपल्या व्याख्यानातसुप्रसिद्ध वक्ते आणिसाहित्यिक डॉ. हेमंत खडके म्हणाले की, वाचन माणसाला सुसंस्कृत करते. समृद्ध करते.वाचन प्रेम, मैत्री



आणिअहिंसा अशा उदात्त मूल्यांकडे घेऊन जाऊ शकते.माणसाला माणूस म्हणून घडवण्याचे महान कार्य वाचन करीत असते, मानवाच्या जडणघडणीमध्ये व्यक्तिमत्त्व विकासासाठी चांगल्या पुस्तकाचे वाचन हे हातभार लावित असते. प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून विचार मांडताना मानवविज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. मोना चिमोटे म्हणाल्या की, ग्रंथवाचनाचे मोल मोठे आहे. ग्रंथ आपल्याला संकुचित परिघातून बाहेर काढतात आणि एका व्यापक विचारसरणीकडे घेऊन जातात. नवीन पिढीने मोबाईलच्या व्यसनात गुंतून न पडता वाचनाची सवय लावून घेतली पाहिजे.कार्यक्रमाच्या अध्यक्ष ज्ञानस्रोत केन्द्राच्या संचालक तसेच आंतरविद्याशाखीय विद्याशाखेच्या अधिष्ठाताडॉ. वैशाली गुडधे यांनी, समाजामध्ये ग्रंथ व्यवहार वाढला पाहिजे.ज्या समाजामध्ये वाचनाची गोडी असते तो समाज भविष्यात सगळ्याच क्षेत्रांमध्ये प्रगती करतो, असे विचार मांडले. सदर कार्यक्रमप्रसंगी ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. माधव पुटवाड मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विशाल बापटे यांनी तर सूत्रसंचालन एम. ए (मराठी) भाग एकची विद्यार्थिनी साक्षी धुळे हिने केले. प्रसंगी सुरुवातीला सामूहिक वाचनाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यात डॉ. मोना चिमोटे यांनी बालकवींची श्रावणमास ही कविता लयबद्ध पद्धतीने सादर केली तर डॉ. प्रणव कोलते यांनी सुप्रसिद्ध विचारवंत आ. ह. साळुंखे यांच्या आपण दशअब्जाधीश, तरीही... या लेखाचे वाचन केले. कार्यक्रमात प्रा. सुहास पाचपांडे, प्रा. राजेश भोयर, डॉ. जयंत वडतकर, श्री. जावळे तसेच विविध विभागांतील अंशदायी शिक्षक यांची आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग, स्त्री अभ्यास केंद्र, शिक्षण विभाग, मानसशास्त्र विभाग, मराठी विभागइत्यादी विभागांतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आठ एकरात मंडप ते १५ एकरात पार्किंग; भाजपाच्या शिर्डी अधिवेशनाची जय्यत तयारी

## अमरावती मधुन पोटे पाटील यांच्या नेतृत्वात पदाधिकारी रवाना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

विधानसभा निवडणुकीमध्ये घवघवीत यश संपादन केल्यानंतर भारतीय जनता पार्टीचे मोठे नेते शिर्डीत जमणार आहेत. उद्यापासून शिर्डी शहरात भाजपाचे दोन दिवसांचे महाअधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनाची जोरदार तयारी करण्यात आली आहे. यावेळी भाजपचे मंत्री उपस्थित राहणार आहे. यामध्ये केंद्रीय गृहमंत्री, मुख्यमंत्री तसेच राज्यातील भाजपाचे सर्व मंत्री, केंद्रातील मंत्री, खासदार, आमदार, जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष असे १५ हजार पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.



भारतीय जनता पक्षाचे राज्यस्तरीय अधिवेशन येत्या १२ जानेवारी (रविवार) रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी येथे होत आहे. नुकत्याच मिळालेल्या विजयाच्या पार्श्वभूमीवर तसेच आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीची रणनिती या अधिवेशनात ठरविली जाणार असल्याने या अधिवेशनाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. या अधिवेशनात अनेक राजकीय मुद्द्यांवरही चर्चा होणार असल्याची माहिती आहे.आज अमरावती मधून भाजप शहर अध्यक्ष प्रवीण पोटे पाटील यांच्या नेतृत्वात भाजप पदाधिकारी शिर्डी साठी रवाना झाले आहेत.

अधिवेशनासाठी साई संस्थानच्या प्रसादालया शेजारील शताब्दी मैदानावर तीन भव्य मंडप उभारण्यात आले आहेत. ११ तारखेला भाजपच्या कोअर कमिटीची बैठक होऊन १२ तारखेला सकाळी नड्डा अधिवेशाचे उद्घाटन करतील. दुपारी शाह भाजपच्या मंत्री, खासदार, आमदारांसह आलेल्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतील. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका तसेच पुढील वाटचालीच्या रणनीतीवर अधिवेशनात शिक्कामोर्तब होईल. अमित शाह शिर्डीनंतर शनिशिंगणापूरलाही जाणार आहेत.

अधिवेशनासाठी आठ एकर जागेवर भव्य मंडप उभारण्यात आला. त्यात पदाधिकाऱ्यांसाठी १५ हजार खुर्च्या लावण्यात आल्या आहेत. त्यात १ हजार व्हीआयपी खुर्च्यांचा समावेश आहे. ८० बाय ४० आकाराच्या मंचावर शाह, नड्डांशिवाय केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री, राज्य मंत्रिमंडळातील मंत्र्यांची आसन व्यवस्था आहे. १५ एकर जागा पार्किंगसाठी ठेवली आहे.

**प्रदेशाध्यक्षाची नियुक्ती होणार का?**

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे विधानसभा निवडणुकीत विजयी होऊन मंत्री झाले आहेत. आता त्यांच्यानंतर प्रदेशाध्यक्ष कोण असेल याची चर्चा सुरू झाली आहे. प्रदेशाध्यक्षपदासाठी पक्षांतर्गत मोठी प्रक्रिया असून या प्रक्रियेला सुरुवात झाल्याचे बावनकुळे यांनी काही दिवसांपूर्वी सांगितले होते. तर दुसरीकडे या पदासाठी माजी मंत्री आणि डोंबिवलीचे आमदार रवींद्र चव्हाण यांचं नाव आघाडीवर आहे. आणखीही काही नावांची चर्चा सुरू आहे. अशा परिस्थितीत शिर्डीच्या अधिवेशनात प्रदेशाध्यक्ष पदासाठी नावाची घोषणा होणार का हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# जिल्ह्यात मकरसंक्रांतीनिमित्त वाण खरेदीसाठी महिलांची गर्दी

## तीळ, गूळ खरेदीवर भर : बाजारपेठेत सजली वस्तूंची दुकाने

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

प्रेम, आपुलकीचा संदेश देणारा मकरसंक्रांतीचा सण मंगळवारी (दि. १४) असल्याने बाजारपेठेत महिलांची वर्दळ वाढली आहे. महाराष्ट्रात मकरसंक्रांत सण तीळ आणि गूळ खाऊन उत्साहात साजरा केला जातो.



सणाच्या पार्श्वभूमीवर आकर्षक साड्या, सौंदर्यप्रसाधनांची निवड करण्यात येत आहे. तसेच गावरान तीळ, गूळ, सुगडी, वाण देण्यासाठीच्या विविध वस्तू विक्रीसाठी बाजारपेठेत दुकाने सजली आहेत. या दिवसात साड्या आणि बांगड्यांच्या दुकानावर महिलांची मोठी गर्दी दिसून येत आहे. मकरसंक्रांत सणानिमित्त बाजारपेठांत चैतन्याचे व उत्साहाचे वातावरण संचारले आहे.नवीन वर्षातील पहिला सण म्हणजे मकरसंक्रांत. हा सण अवघ्या तीन दिवसांवर येऊन ठेपला आहे. तीळ, गूळ हळदी-कुंकवाच्या वस्तूंसह कापड दुकानात तसेच वाणाचे साहित्य, सौंदर्यप्रसाधने खरेदीसाठी शहरांसोबत ग्रामीण भागातील बाजारपेठांमध्ये महिलांची लगबग दिसू लागली आहे. मकरसंक्रांतीला काळ्या रंगाची साडी नेसण्याची प्रथा आहे.मकरसंक्रांतीसाठी गावरान तिळाची मागणी वाढली आहे. यासोबतच रेडिमेड तिळगूळ, तिळाचे लाडू, तिळाच्या वड्या, साखर गुळाची रेवडी, हलवा आदींची खरेदीही सुरू झाली आहे. हळद, कुंकवाचे वाण खरेदी सोबतच चमचे, वाटी, करंडा, ताट, तांबे आदी वस्तूंची खरेदी होत आहे. काही महिला वाण म्हणून छोटी रोपटे देतात. अनेक महिला आता वाचनीय पुस्तकेही वाण म्हणून देतात.

### वाणाच्या वस्तू झाल्या महाग


मकरसंक्रांत सणात महिला वर्ग एकमेकींना तिळगुळासह विविध वस्तूंचे वाण वाटतात. गतवर्षीच्या तुलनेत यंदा वाणाच्या वस्तूंचे दर १५ ते २० टक्क्यांनी महागल्याचे व्यापारी सांगत आहेत. वाणात देण्यात येणारे स्टील, प्लॅस्टिक आणि फायबरची भांडी, कॉस्मेटिक वस्तू, सौंदर्याच्या वस्तू, घरगुती वस्तू मुबलक प्रमाणात बाजारात उपलब्ध झाल्या आहेत.

# शाळेत जाणाऱ्या पोराच्या हातात दुचाकी; पालकाविरुद्ध गुन्हा दाखल

## ...तर मुलाला पाच हजार आणि वाहनमालकाला दहा हजारांचा होतो दंड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११अमरावती**

मुलांना आता शाळेतच दुचाकी घेऊन जाण्याची सवय लावली जात आहे कोचिंग क्लासेससाठी विविध ठिकाणी जावे लागते. हे कारण सांगून पालक मुलांच्या हातात वाहन देत आहेत. अल्पवयीन मुलांना वाहन दिल्यास पालकावर कायदेशीर कारवाई होते. ही बाब माहीत असूनही पालक धोका पत्करत आहेत. शहरात या कायद्याची अंमलबजावणी होत नसल्यामुळे पालकही बिनधास्त झाले आहेत. यामुळे अगदी आठवी, नववीतल्या मुलाच्या हातात घरची दुचाकी सहज दिली जाते. यातून मोठा धोका होऊ शकतो.अल्पवयीन मुलगा वाहन चालविताना आढळल्यास त्याला पाच हजारांचा दंड व वाहनमालकाला दहा हजारांचा दंड अशी कायदेशीर तरतूद आहे. तसा ड्राईव्ह अद्याप शहरात घेण्यात आलेला नाही.अल्पवयीनाच्या हातून दुचाकीने अपघात घडल्यास पालकावरच कारागृहात जाण्याची वेळ येऊ शकते, तशी कारवाई काही ठिकाणी झाली आहे.



**शारीरिक तंदुरुस्तीसाठी सायकलिंग फायद्याची**

अल्पवयीनांनी जास्तीत जास्त सायकलचा वापर केल्यास त्याची शारीरिक तंदुरुस्ती चांगली राहते. आरोग्य सुधारण्यास मदत होते. प्रतिकारक्षमता वाढते. या सर्व फायद्यांकडे दुर्लक्ष करत केवळ मुलांच्या हट्टाखातर त्यांना दुचाकी वाहनाची सवय लावली जाते.

# शेतात सिंचनाची सोय होणार आता विहिरीसाठी चार लाख मिळणार

## शासनाकडून अनुदानात सुधारणा अनुसूचित जाती-जमातीच्या शेतकयांना लाभ




**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

समाजातील अनुसूचित जाती - जमातीच्या शेतकऱ्यांच्या शेतात सिंचनाची शाश्वत सुविधा उपलब्ध करून देऊन आर्थिक उत्पन्न वाढविण्याकरिता सन-२०२४ ते २०२५ नवीन सुधारित अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी विहिरीच्या बांधकामाकरिता अडीच लाखांचे अनुदान दिले जायचे; पण यावर्षीपासून चार लाख रुपयांचे अनुदान दिले जाणार असल्याने अनुसूचित जाती-जमातीच्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्यामुळे त्यांनी या योजनेकरिता तातडीने अर्ज करण्याची गरज आहे. अनुसूचित जाती किंवा नवबौद्ध शेतकऱ्यांकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वालंबन योजना, तर आदिवासी शेतकऱ्यांकरिता बिरसा मुंडा कृषीक्रांती योजना राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने राबविली जात आहे. याची अंमलबजावणी जिल्हा परिषद कृषी विभाग करीत असून आता शेतकऱ्यांना विहिरीच्या बांधकामाकरिता अडीच नाही तर चारलाखांचे अनुदान मिळणार आहे. त्यामुळे या योजनेचा लाभ घेण्याकरिता ऑनलाइन अर्ज करावा लागतो. त्यामुळे इच्छुक शेतकऱ्यांनी http://mahadbt.maharashtra.gov.in/farmer/login/login यामहाडीबीटीच्या संकेत ऑनलाइन अर्ज दाखल क आवाहन कृषी विभागाने केले आहे.

### योजनेच्या लाभाकरिता निकष काय?

लाभार्थी हा अनुसूचित जाती किंवा नवबौद्ध, अनुसूचित जमातीचा असावा, शेतकऱ्यांकडे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र असावे. स्वतःच्या नावे ०.४० हेक्टर व कमाल ६ हेक्टर शेती असावी. शेतकऱ्याच्या नावे जमिनीचा सातबारा, ८-अ उतारा असणे आवश्यक आहे. दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांना प्रथम प्राधान्य. लाभार्थ्याकडे आधार कार्ड, स्वतःचे बँक खाते व ते आधारसोबत संलग्न असणे आवश्यक आहे. संबंधित योजनेचा एकदा लाभ घेतल्यास पुढील पाच वर्षे त्याच लाभार्थ्यास किंवा कुटुंबाला योजनेचा लाभ मिळणार नाही, तसेच नवीन विहिरीचा लाभ घेतल्यास त्याला २० वर्षानंतर जुनी विहीर दुरुस्तीस अनुदान मिळेल, योजनेचा लाभ घेतलेल्यांच्या सातबारावर नोंद घेतली जाणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा क्रांती योजनेतून नवीन विहिरीच्या बांधकामासाठी ४ लाख, जुनी विहीर दुरुस्ती १ लाख रुपये, १० अश्वशक्ती क्षमतेपर्यंत पंपसंचाकरिता प्रचलित आर्थिक मापदंडाच्या किंवा प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चाच्या पंप संचाकरिता ९० टक्के रक्कम किंवा ४० हजार रुपये, वीज जोडणी आकार २० हजार, इनवेन बोअरिंग ४० हजार, सोलार पंप ५० हजार, शेततळ्याचेप्लास्टिक अस्तरीकरणासाठी २ लाख, यंत्रसामग्री व अवजारे ५० हजार रुपये, तुषार सिंचनाकरिता १५ टक्के किंवा ४७ हजारांपर्यंतची मर्यादा व ठिबक सिंचनाकरिता १५ टक्के रक्कम किंवा ९७ हजारांपर्यंतचे अनुदान दिले जाते. केवळ बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेच्या लाभार्थ्यांना (वनक्षेत्रातील आदिवासी शेतकऱ्यांनाच) विधन विहिरीकरिता ५० हजारांचे अनुदान मिळते.

# निवृत्त 'आयएएस' प्रविण परदेशींचं 'फेसबुक' हॅक उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या 'पीए'ला गंडा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर**

सायबर गुन्हेगारांकडून फसवणुकीचे वेगवेगळे फंडे वापरून नागरिकांना जाळ्यात ओढण्यात येत असून, काही कालावधीपासून त्यांनी 'आयएएस', 'आयपीएस' अधिकाऱ्यांनादेखील 'टार्गेट' करण्यास सुरुवात केली आहे. निवृत्त 'आयएएस' अधिकारी प्रवीण परदेशी यांचे फेसबुक खाते 'हॅक' करून सायबर गुन्हेगारांनी जुने फर्निचर विक्रीच्या नावाखाली जाळे टाकले. आश्चर्याची बाब म्हणजे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे स्वीय सहायक त्यात अडकले व खिशातील ७५ हजार रुपये गमावले. शंका आल्याने वेळीच परदेशी यांना फोन केल्याने आणखी मोठी फसवणूक होण्यापासून वाचली. या प्रकरणात नागपुरात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



विनायक कुलकर्णी (४५, वांद्रे, मुंबई) असे तक्रारदाराचे नाव आहे. हिवाळी अधिवेशनानिमित्ताने ते डिसेंबर महिन्यात नागपूरला होते. २२ डिसेंबर रोजी ते त्यांचे सहकारी व आयटी इंजिनिअर आलम खान यांच्यासोबत जेवण करत होते. त्यावेळी आलम खान यांच्या फेसबुक मॅसेंजरवर प्रवीण परदेशी यांच्याकडून मॅसेज आला. त्यात फर्निचरचे फोटो होते. सीआरपीएफच्या एका असिस्टंट कमांडटची बदली झाल्याने त्याला सोफा, कपाट, एसी, सायकल, इन्व्हर्टर, डायनिंग टेबल, बेड, फ्रीज, टीव्ही, इत्यादी वस्तू केवळ १.०५ लाख रुपयांत विकायच्या असल्याचे त्यात नमूद होते. जर वस्तू विकत घ्यायच्या असतील, तर सांगावे असेदेखील मॅसेजमध्ये होते.

# टिपेश्वर अभयारण्यातील दोन वाघ बेपत्ता : तलाववाली आणि जंजीर या दोघांच्याही पाऊलखुणा किंवा हालचाल पर्यटकांना आढळलेले नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर**

यवतमाळ जिल्ह्यातील टिपेश्वर अभयारण्यातील 'तलाववाली' ही वाघीण आणि 'जंजीर' हा वाघ पर्यटनाच्या या हंगामापासून पर्यटकांना दिसलेले नाहीत. अभयारण्यातील या हंगामातील पर्यटन सुरू झाल्यानंतर या दोघांच्याही पाऊलखुणा किंवा हालचाल पर्यटकांना आढळलेले नाहीत. त्यामुळे या दोन्ही वाघांच्या बेपत्ता होण्यामुळे वन्यजीवप्रेमी आणि वन्यजीव संवर्धकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

टिपेश्वर अभयारण्यातील वाघांच्या बेपत्ता होण्याची ही पहिलीच घटना नाही. यापूर्वी देखील या अभयारण्यातून वाघ बेपत्ता होण्याचे प्रकार घडले आहेत. 'स्टार' हा वाघ आणि 'पिलखान' ही वाघीण बेपत्ता झाले आहेत. त्यांचे काय झाले हे कुणालाही ठाऊक नाही. या घटना अभयारण्यात वाघांच्या संरक्षणासाठी प्रभावी शोध आणि तपासणी यंत्रणा उभारण्याची गरज अधोरेखित करतात. संवर्धन तज्ज्ञांनी वनविभागाला 'तलाववाली' आणि 'जंजीर' यांच्या शोधासाठी त्वरित कारवाई करण्याचे आवाहन केले आहे. कॅमेरा ट्रॅप बसवणे, तज्ञ ट्रॅकर्सची मदत घेणे आणि शोधमोहीम राबवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले आहे. या प्रकरणाकडे दुर्लक्ष केल्यास केवळ बेपत्ता वाघांचाच नाही, तर अभयारण्याच्या पर्यावरणीय समतोलाचाही धोका निर्माण होऊ शकतो. वनविभागाकडून मात्र



यासंदर्भात अद्याप कोणतेही अधिकृत निवेदन आलेले नाही. मात्र, वन्यजीव प्रेमी आणि स्थानिक मार्गदर्शकांकडून लवकरात लवकर योग्य ती कारवाई होईल, अशी अपेक्षा व्यक्त करत आहेत. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पावसाळ्यात अभयारण्य पर्यटनासाठी बंद होण्यापूर्वी या दोन्ही वाघांची हालचाल होती. पावसाळ्यानंतर पर्यटनाचा हंगाम सुरू झाल्यानंतर ऑक्टोबरपासून या वाघांचा कोणताही ठावठिकाणा नाही. या अभयारण्यातून यापूर्वीदेखील वाघ बेपत्ता झाले आहेत. जेव्हा 'स्टार' हा वाघ बेपत्ता झाला तेव्हा त्याचा शोध घेण्यासाठी खूप प्रयत्न केले गेले. मात्र, वनविभागाला यश मिळाले नाही. यावेळी तसे प्रयत्न होत नसल्याचे वन्यजीवप्रेमी आणि संवर्धकाचे म्हणणे आहे. दरम्यान, या अभयारण्यातून आजतागायत अनेक वाघांनी इतरत्र स्थलांतर केले आहे. त्यामुळे या वाघांनीसुद्धा इतरत्र स्थलांतर तर केले नाही ना, अशीही एक शंका व्यक्त केली जात आहे. कारण या काळात वाघ इतरत्र स्थलांतर करतात. यापूर्वी उमरेड-पवनी-कऱ्हाडला अभयारण्यातून 'जय' हा वाघ बेपत्ता झाला होता. तर अलीकडेच ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पातून 'माया' ही वाघीण देखील बेपत्ता झाली होती.'तलाववाली' ही वाघीण अभयारण्यातच आहे. तर 'जंजीर' या वाघाचे देखील कॅमेरा ट्रॅपमध्ये छायाचित्र आले होते. तरीही या वाघांचा शोध सुरू आहे. या काळात वाघांचे स्थलांतर होते आणि या अभयारण्यातून झालेले वाघाचे स्थलांतर पाहता ही शक्यता नाकारता येत नाही, असे वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत सोनुले यांनी सांगितले.